# कोम्पेनच्या रानातील

# राष्ट्रीय सूडाचे

# रोमांचकारी नाट्य

१५ जून १९६५ : ३० पैसे

# माणूस

श्रेष्ठ साहित्याचा संग्रह
किफायतशीर गुंतवणूक

# राजा शिवछत्रपती

ब. मो. पुरंदरे

- मोठ्या रॉयल आकाराची एक हजार पृष्ठे (दोन भाग)
- उत्कृष्ट कागद, टिकाऊ बांधणी
- दलालांची आकर्षक रेखाचित्रे व बहुरंगी मुखपृष्ठे
- ऐतिहासिक वास्तूंची छायाचित्रे, नकाशे

**किंमत ३६ रुपये**

**१०० रुपयांची ठेव**
**५ वर्षांसाठी**

- 'राजहंस प्रकाशन संस्थे'कडे ठेवल्यास सात टक्के व्याजाच्या मोबदल्यात हा लोकमान्य व राजमान्य ग्रंथ ताबडतोब विनामूल्य आपल्याला घरपोच मिळेल.
- 'राजहंस प्रकाशन संस्थे'कडे आपली ठेव आजच पाठवा व आपली प्रत राखून ठेवा.
- ठेवीची रक्कम 'राजहंस प्रकाशन' या नावे ड्राफ्टने वा म. ऑ. ने पाठवावी. सोबत नाव, गाव, पत्ता संपूर्ण असावा.
- चेक असल्यास तो पुणे-मुंबई बँकेवरचा असावा. इतर ठिकाणच्या बँकेवरचा चेक असल्यास ७५ पैसे वटणावळ अधिक पाठवावी.

राजहंस प्रकाशन
पुणे

४१९ नारायण, पुणे




वर्ष पाचवे : अंक दुसरा : १५ जून १९६५ : तीस पैसे

★

संपादक : श्री. ग. माजगावकर

★

पत्ता : ४१९ नारायण, पुणे २. दूरध्वनी : ५७३५९

---

**लेख** :
- ● विद्यार्थी सहाय्यक समिती
  - □ 'माणूस' प्रतिनिधी
- ● पोटात एक, ओठात एक
  - □ वि. आ. खेरे

**कथा** :
- ● काही नीच, काही लहान, काही महान
  - □ लीला श्रीवास्तव
- ● संसारयात्रा
  - □ द. ज. जोशी
- ● पगली
  - □ प्रभाकर घोटे

**कविता** :
- ●
  - □ लक्ष्मीकांत तांबोळी
  - □ प्रभा गणोरकर

**पुस्तकपरिचय** :
- ● नाझी भस्मासुराचा उदयास्त
  - □ रा. म. शास्त्री

**शिवाय** :
- ● जगाच्या पाठीवर, रंगभूमी, चित्रपट, क्रीडा, विचारवारे, भिंतीवरील तुंबड्या, लेखनवाचन ही नेहमीची सदरे.

---

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' पाक्षिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यांतील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक असतात.

# पोटात एक ओठात एक

• वि. आ. खैरे

१५ मार्च च्या "माणूस"च्या अंकात 'भिंतीला तुंबड्या' या सदरात श्री. सुधाकर राजे यांनी राजधानीतील हिन्दीचे नमुने दिले आहेत. त्यांत 'समय' म्हणजे 'टाईम' आणि 'वक्त' असे दोन अर्थ क्रमिक पुस्तकांत आढळतात. हा एक नमुना दिला आहे.

तसे पाहिले तर हा केवळ 'हिंदी' विनोदाचा मासला नसून, 'क्रमिक' विनोदाचाही मासला म्हटला पाहिजे. क्रमिक पुस्तके किती विनोदी असू शकतात, याचा वस्तुपाठ 'मऱ्हाटीचिये नगरी' सुद्धा मिळालाच आहे. तेव्हा हिंदीवाल्यांनाच हसायला नको. शब्दार्थाच्या बाबतीत आपण मागे आहोत असे नाही. "खोंड" म्हणजे 'गाईचे पुंल्लिगी वासरू' हा अर्थ एका 'बाळबोध' पुस्तकातला आहे. त्याची सर 'मुख्याध्यापिका=हेडमिस्ट्रेस'ला येऊ शकत नाही.

पण हा विनोदाचा पडदा जरा दूर केला, तर जे भयावह रूप दिसते, त्याचा जरा गंभीरपणे विचार केला पाहिजे. असले प्रकार अवलक्षणीच आहेत काय ? असल्यास का होतात ? या प्रश्नांची उत्तरे शोधली पाहिजेत.

क्रमिक पुस्तकांत आणि एकूणच शिक्षणक्रमात, ज्ञाताकडून अज्ञाताकडे हे मुख्य सूत्र असते. भाषेच्या अभ्यासात, नवीनच आलेल्या कठीण शब्दांचा अर्थ माहीत असलेल्या सोप्या शब्दांत दिलेला असतो. वर जी उदाहरणे दिली, त्यांत अनर्थकारी अर्थ दिले आहेत, असे घटकाभर मानले, तरी कठीण शब्दांचा अर्थ सोप्या शब्दांत दिलेला आहे काय ? थोड्या विचारांती असे दिसेल, की या प्रश्नाचे उत्तर 'होय' असे आहे, धक्का देणारे वाटले तरी सत्य आहे.

'समय' हा शब्द हिंदी बोलभाषेतला नाही. हिन्दी भाषिक कुटंबीय 'वक्त' किंवा 'टाईम' हाच शब्द बोलताना वापरीत असतो. उर्दू (फारसी) आणि इंग्रजी शब्द म्हणजे भाषेवरचा कलंक असे मानणाऱ्या शुद्धिवाद्यांनी 'समया'पुढे समया पाजळत ठेवल्या आहेत. सामान्य कुटुंबातील मूल ज्या परिस्थितीत वाढते, तिच्यात वेळेला वक्त किंवा टाईमच म्हणतात. म्हणून समय हा शब्द त्याला प्रथम अडतो, तेव्हा त्याचा पर्याय दोहोतच त्याला सापडेल. 'मुख्याध्यापिका' ही फक्त कागदावर पुजायची सरस्वती आहे. दिवसाकाठी आठ घंटे शिकवणारी मास्तरीण 'हेड-

●

हा नेहमीचा 'दरबार' नव्हे,
पण 'दिल्लीच्या' हिंदीविषयी हा एक चुर-
चुरीत छोटा लेख आहे.
दिल्लीला ग्रासणाऱ्या एका चालू प्रश्नावरील
एक मतप्रदर्शन.

●

मिस्ट्रेस्' म्हणूनच ओळखली जाते. जिभेला आढे दोन्हीसही सारखेच बसतात, पण हेडमिस्ट्रेस जिभेवर जास्त सहज नाचते खरी !

'खोंडा'ची पाणिनीय व्याख्या देणारालाही क्षमा केली पाहिजे. खेड्यापाड्यांत राहाणाऱ्या विद्यार्थ्याला खोंड हा शब्द मुळी अडतच नाही. शहरांत राहणाऱ्याला तो अडेल. त्याला खोंड म्हणजे नुसता छोटा बैल नव्हे, हे समजले तर पाहिजे ! अशीच काही वेडीविद्री व्याख्या केल्याशिवाय त्याची समजूत पटणार नाही.

आता लक्षात येईल, की या मुलखावेगळ्या भाषा–अशुद्धीचे कारण तारतम्य-रहित भाषाशुद्धी हे आहे ! शब्द इंग्रजी किंवा फारसी आहे ना–मग त्याचे नाव-सुद्धा घ्यायचे नाही, त्याच्यातल्या कल्पनेला भरल्या पंक्तीतून हाकून लावायचे आणि संस्कृताचे तीर्थोदक शिंपून मगच घरात घ्यायचे या कर्मठ भाषाशुद्धीमधून असली विचित्रे जन्माला येतात. सामान्य जन टाईम, टाईमशीर, बेटाईम असले शब्द वापरीत असले, तरी लिहिताना आम्ही 'समय'च म्हणणार. प्रा. राजाध्यक्षांनी लिहिल्याप्रमाणे बोलताना स्टॅटिस्टिक्स म्हटलं तर चालतं, पण लिहिताना संख्या-शास्त्रच म्हणायला पाहिजे. असला दुटप्पीपणा येतो, तेव्हा ग्रांथिक भाषा बोलभाषे-पासून पार निराळी होते. तुपाला 'तुंप' म्हटले म्हणजे आपण 'संस्कृतान्त' बोललो, असे रांगड्याला वाटते, तसाच प्रकार व्यत्यासाने या शुद्धिवाद्यांच्या बाब-तीत होत असतो.

## विद्वान काय करतात ?

पण बिचाऱ्या शालेय पुस्तककारावर घसरून काय उपयोग ? त्यांचे ज्ञान तोटके, आणि ते तोटके आहे, यांची त्याना जाणीवही असते. याउलट, आपल्या ज्ञानाची जाणीव असणारे विद्वान काय करीत असतात, तेही पाहणे मनोरंजक ठरेल.

देशी भाषांतील आम विद्वानांचे ठाम मत आहे, की वाचक म्हटला, की त्याला इंग्रजी येत असलेच पाहिजे ! अ. का. प्रियोळकर एवढे मराठीचे अभिमानी ! 'दादोबा पांडुरंग'च्या प्रस्तावनेत म्हणतात, की "या ग्रंथाचा वाचक निव्वळ मराठी

जाणणारा असा बहुधा नसणारच, म्हणून इंग्रजी उताऱ्यांचे मराठी भाषांतर देता आलेले नाही, तरी काही हरकत नाही !" आपल्या वाचकाला इंग्रजी येतेच आणि आपल्यासारखेच 'फाडफाड' येते, असे गृहीत धरल्यावर मार्ग फार सोपा होतो ! विचार इंग्रजीत करावा किंवा शक्यतोवर इंग्रजीतलाच उचलावा, मराठीत उतरावा, शब्द अडेल तिथे डिमॉस्थेनीसच्या दाढेतल्या गोटीसारखा टणक संस्कृत शब्द मराठी म्हणून घालावा आणि शिवाय पवित्र रोमन लिपीत मुळातला इंग्रजी शब्दही लिहून दाखवावा ! मराठी लेखनाचा अर्थ निश्चित करायला इंग्रजी फूटपट्टी वापरली पाहिजे. समयाला टाईम म्हणणारा नागरी लिपी तरी वापरतो. उच्च कोटीतला विद्वान Time म्हणून रोमन लिपीत लिहील. हे मी वैज्ञानिक लेखनाबद्दल लिहीत नाही. साहित्यसमीक्षा, तत्त्वविचार, राजकारण यांसारख्या मानवविद्यांवरील लेखनाचे सांगत आहे. कृ. पा. कुलकर्ण्यांसारख्या भाषापंडिताला वस्तू असे ठळक अक्षरात लिहून referent असे इंग्रजीही द्यावे लागते किंवा टीकाकाराला 'घाट,' 'पोत' असले शब्द वापरले, की लागलीच कंसात Pettern लिहावे लागते, ही कशाची लक्षणे ?

## भाषावृद्धीला भाषाशुद्धीची अडचण

परक्या भाषेतले, विशेषत: इंग्रजी आणि फारसी या एकेकाळच्या आपल्या जेत्याच्या भाषांतले शब्द फेकून त्यांच्याजागी संस्कृत किंवा स्वभाषेतले शब्द आणले, की भाषा शुद्ध होते काय, या प्रश्नाची पुष्कळच चर्चा आजवर झालेली आहे. त्या वादात आपण शिरणार नाही. या शब्दशुद्धीचे जे ढोबळ कुपरिणाम होत आहेत, त्यांच्याकडे मात्र आवर्जून पाहिले पाहिजे. तसे केल्यास भाषाशुद्धीची भाषावृद्धीला अडचण होणार नाही. किंबहुना भाषा अधिक संपन्न होईल.

शब्दांची भाषांतरे करण्यात भाषेचा विचार साकल्याने करण्याचा विसर पडतो, अशी आजची अवस्था आहे. इंग्रजी शब्द घेतला, की त्याच्याशी जवळच्या अर्थाचा संस्कृत शब्द बनवायचा अशी रीत आहे. यामध्ये प्रत्येक शब्दाच्याभोवती थोडे काव्यमय, थोडे परंपरेचे असे जे काही वलय असते, ते नष्ट होते. मुळातला शब्द सरळच घेतला आणि त्याचे स्पष्टीकरण केले, तर त्याचे तरी ते वलय कायम राहील; पण नवा शब्द निव्वळ बाटगा असतो. त्याला परंपराही नसते आणि यंत्रात उत्पन्न झालेल्या कवितेप्रमाणे तो काव्यहीन असतो.

संस्कृत शब्द आपल्या भाषांमध्ये तत्सम आणि तद्भव अशा दोन्ही रूपांत येतात. एकाच संस्कृत शब्दातून आलेला तत्सम आणि तद्भव या शब्दांची जोडी घेतली, तर दोघांच्या अर्थच्छटा वेगळ्या आहेत, याचा अनुभव येईल. 'प्रकट' आणि 'परखड' या दोघांचे मूळ एकच, पण दोघांच्या अर्थात सूक्ष्म भेद आहे. हा परंपरेचा परिणाम आहे. शब्दाभोवतीचे वलय म्हटले ते हेच. "अवलाद" ला

'संतान' म्हणता येईल, पण तरीही दोघांच्या अर्थातली तफावत कायमच राहील. "हिंदी ठीक आहे, पण काही म्हणा, उर्दू जरा जास्ती जोरदार वाटते," असे उद्‌गार अनेकांच्या तोंडून ऐकायला मिळतात, यातले रहस्य हेच आहे.

म्हणून आपण नवे शब्द तयार करतो, तेव्हा "जुन्याच्या जागी नवा" असा आग्रह न धरता "जुन्याच्या जोडीने नवा" असा लवचिकपणा पत्करला पाहिजे. म्हणजे मग नव्यानव्या अर्थच्छटा त्यांमधून प्रतीत होऊ लागतील; भाषेची शब्द-संपन्नता वाढेल आणि विचारवाहनाचे सामर्थ्य उणे पडणार नाही. विकासासाठी परक्याचे कर्ज आणि स्वत:चे मुद्दल व कष्ट कामी येत असतात. समाज हा नाना जातीजमातींनी, वंश-गोत्रांनी बनतो, तशी सर्वसमावेशक वृत्ती आपण या बाबतीत स्वीकारली पाहिजे. दुरभिमानातून उन्नती होणे कठीण आहे.

## उच्चार-विचारांची एकरूपता

विचारवाहन हे भाषेचे प्रधान ध्येय. उच्चार-शब्दांना प्रत्येक भाषेत काही व्यक्तित्व आहे आणि आपल्या भाषेत परभाषेतले विचार आणायचे, तर नुसत्या शब्दशुद्धीपेक्षा, भाषेची प्रकृती सांभाळून नवे रस, नवे शब्द तिच्यात ओतले पाहिजेत. याची जाणीव ठेवली नाही, तर आपण नुसते तर्जुमाबहाद्दर बनून राहू. इंग्रजी शब्दांतला विचार हे लक्ष्य, तेच लक्षात, मग नाइलाजाने मराठीत किंवा हिंदीत त्याचे रूपांतर करावयाचे, असला प्रकार राहाता कामा नये. परभाषेतला विचार पचनी पाडून स्वभाषेच्या द्वारा मांडण्याची आच पाहिजे. त्यात एकेका शब्दाला दुय्यम स्थान आहे, असे केले तरच सध्या चालू असलेला "ओठात एक, पोटात एक" हा प्रकार बंद होईल आणि खरीखुरी संपन्न व प्रवाही भाषा आपल्याला मिळेल.

[ 'दिल्ली दरबार' हे नेहमीचे सदर वेळेवर हाती आले नाही---सं. ]



# जगाच्या पाठीवर

## □ ‘ प्लॅस्टिकमय ’ जपानी युवती

जपान म्हटले म्हणजे एका समृद्ध, संपन्न, धडाडीच्या देशाचे चित्र आपल्या डोळ्यांपुढे उभे राहते. महायुद्धात होरपळून निघालेल्या या राष्ट्राने विज्ञानाच्या सहाय्याने आपला कायापालट करून घेतला. मृत्यूच्या दारात जाऊन ठेपलेल्या या ‘ उगवत्या सूर्याच्या देशात ’ नव-चैतन्याचा वसंत फुलला. औद्योगीकरणाच्या संजीवनीमुळे या देशाला पुनर्जन्म मिळाला व तो आता सुखाच्या राशीवर लोळतो आहे. ऋद्धि-सिद्धी त्याच्यापुढे हात जोडून उभ्या आहेत. औद्योगिकदृष्टया आशिया-तील अग्रेसर देश म्हणून जपान ओळखला जातो.

परंतु औद्योगीकरणाच्या पोटात खोलवर एक सूक्ष्म व्यथा दडली आहे. ऐश्वर्य आणि भरभराटीच्या मागे एक काळीज कापणारे दुःख उभे आहे. ते दुःख आहे भावनांचे ! जो जो औद्योगीकरण अधिकाधिक होत आहे, तो तो भावना लोप पावत आहेत. प्रेम, वात्सल्य अशा जीवनातील मूलभूत भावना माणूस विसरत चालला आहे. जीवनाला बाजारी स्वरूप आले आहे. आपण बाजारात एखादी वस्तू चांगली असली, तर विकत घेतो. वाईट वस्तू फेकून देतो. माणसाचेही तसेच झाले आहे. माणूस उपयोगी असेल तरच त्याला जगायचा अधिकार आहे. तो निकामी असेल, तर जगाच्या नित्याच्या चक्रातून तो फेकला जातो. यंत्राची गुलामगिरी पत्करल्याने जो तो या बाजारात आपला ‘ वाण ’ खपावा, म्हणून सारखा धावतो आहे. विशेषतः जपानी युवतीला तर या स्पर्धेची चांगलीच झळ पोहोचली आहे.

बसक्या नाकाच्या, अतिशय लहान उरोभागाच्या आणि स्त्रीसुलभ

व्यक्तित्व नसलेल्या जपानी युवतीला स्वर्ग-सुंदरी कोण म्हणेल ? महा युद्धात फार मोठ्या प्रमाणात जपानी लोक मृत्युमुखी पडले, म्हणून तरी या युवतींना नोकऱ्या मिळत आहेत, परंतु स्त्रियांच्या जगात या युवतींचा 'भाव' अगदीच कमी आहे. तेव्हा कसेबसे जीवन कंठण्यासाठी या युवतींना कृत्रिम साधनांच्या वापराने टवटवीत सौंदर्याचा आभास निर्माण करावा लागतो.

थोडेसे पैसे जवळ असले, की जपानी युवती बसके नाक व अशासारख्या सौंदर्यास बाध आणणाऱ्या गोष्टींत बदल घडवून आणू शकते. एक छोटेसे ऑपरेशन केले, की तिच्या भावहीन डोळ्यांत मादकतेचा रंग तरळू लागतो ! यासाठी जास्तीतजास्त खर्च फक्त तीस पौंड येतो.

नुसते डोळे एवढाच काही तिच्या सौंदर्याच्या आड येणारा भाग नसतो. फतकल मारून बसलेले नाकही सौंदर्याच्या आड येत असतेच ! कठीण प्लॅस्टिक वापरून हे 'बसलेले' नाक 'उभे' करता येते. आणखी सफाईदार ऑपरेशन करून नाकाला हवातसा छानदार आकार देता येतो. अगदी थेट चाफेकळीसारखेदेखील हे नाक करता येते. डोळ्यांच्या

[पृष्ठ ६६ वर चालू]


## सूचना

- दीपावली व सर्व खास अंकांसह माणूसची वार्षिक वर्गणी आठ रुपये व परदेशी बारा रुपये आहे.
- **वर्गणी मनीऑर्डरने** यावी. चेक पाठवावयाचा झाल्यास तो 'व्यवस्थापक माणूस' या नावे पुणे किंवा मुंबई बँकेवरचा असावा. इतर ठिकाणच्या बँकेवरचा असल्यास ७५ पैसे वटणावळ पाठवावी.
- **अंक न पोहचल्याचे** कळवावयाचे झाल्यास ५ व २० तारखेपर्यंत वाट पाहून मगच कळवावे. अंक आमचे कार्यालयात शिल्लक असल्यास जरूर पाठविले जातात.

**लेखकांसाठी :** स्वीकृत साहित्याचाच फक्त निर्णय कळविला जातो. नापसंत साहित्याचा निर्णय व ते परत हवे असल्यास पुरेसे पोस्टेज सोबत पाठविणे अत्यावश्यक आहे.

# विद्यार्थ्यांचे नवे घर

## विद्यार्थी सहाय्यक समिति, पुणे

**आमचे प्रतिनिधीकडून**

'पचकन थुंकणारा, कराकरा मांडी खाजवणारा व शून्य नजरेने पाहणारा' गावकरी आता फार तर ग्रामीण कथाकारांच्या कथांतूनच सापडेल. प्रत्यक्षात मात्र ग्रामीण महाराष्ट्राचा झपाटयाने कायापालट होत आहे, झालेला आहे.

याची कारणे दोन. शिक्षणाचा प्रसार आणि औद्योगिक क्रांती.

परिणाम असा होतो, की खेडयांतून शिक्षणासाठी व नशीब काढण्यासाठी शहराकडे येणाऱ्या विद्यार्थ्यांचा ओघ दरवर्षी वाढत आहे.

यांत बडया बागायतदारांच्या किंवा श्रीमंत शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्नच नाही. कारण पैशाच्या बळावर ते कुठेही आपली सोय लावू शकतात; पण गरीब मुलांचे काय? शिक्षण घेण्याची, पांढरपेशा समाजाचे जीवनमान अनुसरण्याची योग्य आकांक्षा त्यांनी मनाशी बाळगलेली असते, पण परिस्थिती पुढे जाऊ देत नाही. अशा विद्यार्थ्यांना शहरात काही स्वस्त दरात सोयी उपलब्ध झाल्या, तर हवे असते. 'विद्यार्थी सहाय्यक समिती'च्या कार्याचा हा एक भाग. दहा वर्षांपूर्वी ३ मुलांच्या राहण्या-जेवण्याची सोय करू शकणारी समिती आज ५०० च्या आसपास विद्यार्थ्यांना सांभाळू शकते आहे, हा संस्थेला लाभलेल्या निरलस कार्यकर्त्यांच्या व समाजसेवकांच्या कष्टाचा रोकडा पुरावाच म्हटला पाहिजे.

## विद्यार्थ्यांचे घर

'सांभाळणे' या शब्दामागे एक भावना आहे. स्वस्त दरात 'लॉजिंग-बोर्डिंग' चालवणे हा काही समितीचा मुख्य उद्देश नव्हे. खेड्यापाड्यांतून ही मुले येतात. त्यांच्यावर कुटुंबाप्रमाणे जिव्हाळ्याचे व मैत्रीचे संस्कार व्हावेत, या दृष्टीने समितीच्या कार्यकर्त्यांचे प्रयत्न सतत चालू आहेत. या कार्याला 'विद्यार्थी घडवणे' असे मोठे नाव श्री. अच्युतराव आपटे यांनी किर्लोस्कर मासिकाला दिलेल्या मुलाखतीत दिलेले आढळते, पण कार्यकर्त्यांच्या सहजस्वाभाविक प्रेरणांना व वृत्तींना 'ध्येयवादा'चे व्यापक स्वरूप देण्याचा हा प्रयत्न तितकासा ठीक नाही. समिती आज भल्यामोठ्या एकत्र कुटुंबासारखी वाढते आहे आणि ती तशीच वाढण्यात, वाढू देण्यात नावीन्य आहे, वैशिष्ट्यच आहे. विशिष्ट मतप्रणाली किंवा आचारविचारांचा आग्रह धरला, त्यानुरूप संस्कारांसाठी काही विशिष्ट कार्यक्रमांची मांडणी केली, तरच 'विद्यार्थी घडविणे' ही क्रिया संभवते. राष्ट्र सेवा दल, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, बालवीर चळवळ या संस्थांचे कार्य अशा स्वरूपाचे आहे. त्यांची काही ठाम विचारसरणी आहे, त्यासाठी आग्रह आहे. परंतु समितीच्या गेल्या १० वर्षांतील कार्याकडे पाहिल्यास अशी एखादी विचारसरणी तिच्या मुळाशी असल्याचे दिसत नाही. 'समाजासाठी काहीतरी करावे,' या तळमळीने दोन-तीन माणसे एकत्र आली, विद्यार्थ्यांच्या क्षेत्रात काम सुरू झाले. आणखी अशीच भल्या प्रकृतीची माणसे समितीला मिळत गेली. काम वाढत गेले. आज एका चांगल्या संस्कारांच्या कुटुंबाचे स्वरूप तिला प्राप्त झाले आहे. हेच तिचे स्वाभाविक स्वरूप टिकण्यात आनंद आहे, समाधान आहे.

## एक सहजोद्‌गार

सुरवातीपासून समितीच्या आश्रयाने राहणारा एक विद्यार्थी सहज भेटला होता. पानशेतजवळ त्याचे गाव. अंगावरच्या कपड्यांनिशी एका रात्री त्याने घर सोडले. वाटेत एका ट्रकवाल्याने त्याला पुण्यापर्यंत आणले. नगर, संगमनेरला जाऊन, काम करून ३।४ इयत्ता शिक्षण केले. परत पुणे गाठले. कुणीतरी समितीचे नाव सांगितले. समितीच्या मदतीमुळे मॅट्रिकचा उंबरठा ओलांडून आज तो वैद्यकीय शिक्षणाच्या दुसऱ्या

वर्षाला आहे. बोलता बोलता सहज तो म्हणून गेला, " समिती हेच माझे आई वडील. "

श्री. अच्युतरावांचे ' विद्यार्थी घडवणे ' हे शब्द डोक्यात असल्यामुळे मी प्रश्न केला, " शिक्षण संपल्यावर पुढे काय करणार ! "

" तसं काही ठरवलं नाही, पण सोयीच्या ठिकाणी दवाखाना काढणार. राहिलेल्या वेळात समितीचे काम करणार. "

आई-वडील मुलाला ' घडवत ' नसतात. ते त्याला वाढू देतात. वाईट वळणापासून परावृत्त करतात. चांगले वळण लागावे म्हणून धडपड करतात. समितीने आपले हे आई–वडीलपण कायम ठेवावे, कारण त्यामुळेच अनेक सामाजिक भेदाभेदांची तीव्रता नकळत कमी होऊन जाणार आहे. उच्चनीचभावाची कटुता पुसली जाणार आहे. ' जबाबदार व सुसंस्कृत नागरिक ' अशा कौटुंबिक संस्कारातून बाहेर पडेल. ग्रामीण वा शहरी गरीब विद्यार्थ्यांचे ' घर ' होण्यात समिती खूपच काही साधून जाईल, यात शंका नाही.

## ५०० मुलांची आई

घर म्हटले की गृहिणीचा ताबा आलाच. आज समितीच्या कार्य-कर्त्यांमध्ये पुरुषांच्या बरोबरीने गृहिणी आहेत, ही फार महत्त्वाची बाब आहे. केवळ पुरुष असते, तर समितीचा केव्हाच एखादा ' पक्ष ' किंवा ' लॉजिंग–बोर्डिंग हाउस ' बनून गेले असते, परंतु स्त्री–कार्यकर्त्यांमुळे समितीला घराचे घरपण लाभले आहे, हे ओळखले पाहिजे. त्यातल्या त्यात समितीची एक बाई तर ५०० मुलांची आई होऊन एका विशाल संसाराच्या उभारणीसाठी आपला देह कष्टवीत आहे. हे कष्ट उपसताना कुठलाही अहंकार नाही, कसलीही हाव नाही. ' समिती ' जन्मापासूनच या बाईंनी वाढवली, त्यासाठी सर्व प्रकारच्या खस्ता खाल्लया, मानाप-मानाचे विचार बाजूस ठेवले. कुठल्यातरी गावाहून आलेल्या, कुठल्यातरी एखाद्या गरीब मुलाला वार लावून द्यावा, म्हणून प्रतिष्ठितांचे उंबरे तिने झिजवले आणि आज ५००।५०० विद्यार्थ्यांच्या भोजननिवासाची सोय करू शकण्यातकी समिती मोठी झाल्यावर प्रसिद्धीच्या झोतात दुसऱ्याच कोणाला तरी उभे करून ही बाई माजघरात बसून मुलांचे



गेल्या वर्षातील विद्यार्थ्यांच्या निरोपसमारंभात विद्यार्थी व कार्यकर्ते

कौतुक पाहण्यात आनंद मानते आहे. पुन्हा कुठे काय कमी पडते आहे, इकडे लक्ष आहेच. या बाईंचे नाव सौ. सुमित्राबाई केरकर. प्रख्यात गणिततज्ज्ञ रँग्लर डी. डब्ल्यू. केरकर यांच्या पत्नी. यांच्याच स. प. कॉलेजमागील छोट्याशा बंगलीत एका खोलीत विद्यार्थी सहाय्यक समितीचे कार्यालय आहे. समितीकडून बाई जागेचे भाडे वगैरे घेत नाहीतच.

### करडे मामंजी

अच्युतराव ! तुमच्या तळमळीविषयी तर काय सांगावे ! सामाजिक कार्याची आवड, इच्छा आज जवळजवळ नाहीशी होत चालली आहे. अशा कार्याची आजच्या काळात आवश्यकता काय, असा प्रश्न काही चिकित्सक बुद्धिवादी विचारत असतात. सरकारने अशी कार्ये हाती घ्यावीत, असा सल्ला देऊनच हे लोक आपली अकर्मण्यता व स्वार्थ-परायणता झाकण्याचा प्रयत्न करतात. तो त्यांना खुशाल करू द्या, पण अनेक लोक आपले मोल जाणतात. आपली अविश्रांत धडपड पाहून

कौतुकाचे शब्द बोलू लागतात. आपल्यातला 'मामंजी' हा थोड्या टीकेचा विषय आहे म्हणा. घर म्हटले, की असा दराऱ्याचा माणूस हवाच. नाही तर घर उभे राहाणारच कसे! आपण माणसे हेरण्यात चतुर आहात. आपल्याभोवती श्री. किकर, श्री. बुवाजी, यादवराव कुलकर्णी, श्रीप्रसाद, श्री. शहाणे, भाऊसाहेब पटवर्धन, सौ. शांता मालेगावकर, सौ. कमल मावळणकर, सौ. निर्मला पुरंदरे, रजनी पटवर्धन, चंपुताई कुलकर्णी, विजया किंकर, कमल कामत, ताराबाई देसाई, पार्वतीबाई किर्लोस्कर, केशवराव शारंगपाणी, काकासाहेब पर्वते, श्री. हुपरीकर, श्री. व सौ. डोळे अशी ही अनेक नव्या उमेदीची माणसे आपण जमा केलेली आहेत. हा प्रपंच वाढवतील, असा विश्वास बाळगा. आपली आकांक्षा पूर्ण होणार नाही, आपल्याला पूर्ण समाधान लाभणार नाही, ही जाणीव आहेच, कारण असे समाधानी वृत्तीचे आपण असता तर, दहा वर्षांपूर्वी या कार्याला आपण हातच कशाला घातला असता! भरपूर पगाराची नोकरी आहे, शिवाय बेचाळीसच्या आंदोलनात पाय अधू झाल्यामुळे देशभक्तीची पुरेशी शिदोरीही आपण जवळ बांधली आहे, तेव्हा 'तृप्ती'ची उन्हे अंगावर घेत कालक्रमणा चालू ठेवली असतीत, तरी काहीच कमीपणा नव्हता, परंतु आपल्यातील सामाजिक कार्यकर्त्याचा स्वातंत्र्यानंतर अस्त झाला नाही. त्याच्या जागेपणातून हा समितीचा नेटका प्रपंच उभा राहिला आहे. या आपल्या विधायक पुरुषार्थाबद्दल, अच्युतराव! समाज तुमचा ऋणी राहील. आपलं हे कार्य श्री. विठ्ठलराव जोशी, भाऊसाहेब देशपांडे, श्री. के. सी. वखले यांचे सहकार्याने, त्यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तरोत्तर जोमाने वाटचाल करील अशी उमेद आहे. आपल्याला, आपल्या सर्व सहकारी कार्यकर्त्यांना मनःपूर्वक धन्यवाद.

• • •

# विचार धारे

## ● स्वदेशी व्यापारातून परदेशी चलन

प्रगतिशील देशांपुढे औद्योगिक प्रगति साधण्याचे दोन मार्ग असतात — एक म्हणजे संपन्न देशांकडून आर्थिक सहाय्य घेणे व दुसरा म्हणजे त्यांच्याशी व्यापार करून अर्थाजन करणे. या 'एड' व 'ट्रेड'पैकी 'ट्रेड'चा मार्ग नेहमीच अधिक भरवशाचा असतो, हा साधा मंत्र ब्रिटनच्या 'बोर्ड ऑफ ट्रेड'चे अध्यक्ष श्री. डग्लस जे यांनी थोड्या दिवसांपूर्वी दिल्लीला 'प्रगतिशील देशांच्या व्यापार—विषयक समस्या' या विषयावर भाषण करताना सांगितला. प्रगतिशील देशांची अगदी पहिली गरज परदेशी चलन ही असते आणि ती वाढत्या निर्यात व्यापाराने जेवढी पुरी होण्याचा संभव असतो, तेवढी इतर कुठल्याही मार्गाने होण्याची शक्यता नसते.

आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या क्षेत्रात भारताने असे तत्त्व मांडले आहे, की प्रगतिशील देशांचे जीवनमान सुधारायचे असेल, तर त्या देशांतील पक्का माल प्रगत देशांनी आयात होऊ दिला पाहिजे. यासाठी प्रगत देशांनी आपली जकात-बंधने सैल केली पाहिजेत. ब्रिटनला भारताचे हे तत्त्व संपूर्णपणे मान्य आहे व प्रगत देशांना तसे करण्यासाठी प्रवृत्त करण्याच्या कामी भारत व ब्रिटन जोडीने काम करीत आहेत. सध्या जकात—प्रश्नावर जो आंतरराष्ट्रीय ऊहापोह चालू आहे, त्या चर्चेचा 'केनेडी हप्ता' पार पडला, म्हणजे ही बंधने सैल होतील, असे वाटते.

औद्योगीकरणाचा जो प्रवाह हल्ली भारतासारख्या प्रगतिशील देशांतून वाहात आहे, त्यात स्वदेशी तयार मालामुळे तसल्याच मालाच्या आयातीवर होणारा खर्च वाचतो, हे खरे आहे, पण उलटपक्षी असाही अनुभव आला आहे, की अशारीतीने होणारी बचत नवीन कारखान्यांसाठी लागणारी यंत्रसामग्री व तत्सम गोष्टींची आयात करण्यासाठी होणाऱ्या खर्चाने धुऊन निघते.

ब्रिटन साम्यवादी चीनशी व्यापारी संबंध ठेवते ते कसे, या प्रश्नावर जे म्हणाले, "शांततापूर्वक चालणाऱ्या व्यापारावर बंधन घालणे योग्य नाही असे ब्रिटिश सरकारचे मत आहे.— पण या व्यापाराचा भारताच्या राजकीय व व्यापारी हित—संबंधावर कधीही अनिष्ट परिणाम होणार नाही, अशी ब्रिटन दक्षता घेईल."

## ● 'व्हिवा झपाटा'

'अमेरिका' म्हटली, की न्यूयॉर्क—वॉशिंग्टनची अमेरिका डोळ्यांसमोर उभी राहते आणि क्रांती म्हटली, की रशियन क्रांती आठवते; पण अमेरिका—खंडात

हिंदुस्थानाशी बरेच साम्य असलेला एक प्रगतिशील देश आहे व तेथे रशियापूर्वीच क्रांती झाली आहे, याची आठवण मेक्सिकोचे एक अग्रगण्य इतिहासकार डॉ. अर्नायज् फ्रेग यांनी गेल्या आठवड्यात दिल्लीत गप्पा मारताना करून दिली. "हिंदुस्थान फार सुंदर देश आहे; पण आमचा मेक्सिकोही किती सुंदर आहे, हे पाहिल्या-शिवाय कळायचे नाही. दरवर्षी दहा लाख अमेरिकन प्रवासी मेक्सिको पाहायला येतात, ते उगीच नाही..."

मेक्सिकोचे हिंदुस्थानाशी साम्य म्हणजे हिंदुस्थानाप्रमाणेच मेक्सिकोही एक नवीन अर्थ-व्यवस्था घडवू पाहात आहे. ५५ वर्षांपूर्वी मेक्सिकोची परिस्थिती फार वाईट होती. मूठभर लोकांच्या हाती सगळा जमीन-जुमला होता व बाकी सर्व जनता वेठ वळीत होती. जनरल डायजच्या हुकूमशाहीखाली सगळा देश भरडला जात होता, पण मग क्रांती झाली. रशियन क्रांतीच्या ७ वर्षे आधी फ्रॅन्सिस्को मदेरो या लोकनेत्याने एक नवीन श्रद्धा निर्माण केली आणि "श्रद्धेने माणसे बदल-तात." मदेरोने घडवून आणलेल्या क्रांतीतच झपाटा हा क्रांतिवीर पुढे आला. ("झपाटामुळे मार्लोन ब्रँडोला कीर्ती मिळाली, की ब्रँडोमुळे झपाटाला, हे सांगणे मात्र कठीण आहे!") क्रांती यशस्वी झाली व तेव्हापासून मेक्सिकोत समता व समृद्धीचे युग उजाडले--एक समस्या आहे व ती म्हणजे 'लोकसंख्येचा स्फोट', पण मेक्सिको हा कॅथॉलिक देश आहे व कॅथॉलिक धर्ममत संततिनियमनाच्या विरुद्ध आहे. त्यामुळे अजून ही समस्यापूर्ती झालेली नाही.

● **साडीची गोडी**

साडीची प्रशंसा पाश्चिमात्यांकडून ऐकणे, हे आता परिचयाचे झाले आहे, पण पॅरिसच्या फॅशन–सृष्टीच्या विश्वामित्रानेही साडीचे कौतुक करावे, हे जरा विशेषच. फिलिप व्हिने नामक एक आवाडीचे पॅरिसवासी 'फॅशनकार' नवनवीन फॅशन्स-साठी भारतीय डिझाइन्सच्या शोधात नुकतेच हिंदुस्थानाची चक्कर मारून गेले, तेव्हा दिल्लीलाही आले होते. त्यांना प्रश्न करण्यात आला–"नवीन फॅशन्समध्ये साडीच्या धर्तीवर "इव्हिनिंग गाऊन" तयार करण्याचा आपला विचार आहे काय?" "छे, छे!" त्यांनी चटकन उत्तर दिले, "साडीला हात न लावणेच उत्तम. साडीचे 'ड्रेसिंग' (गुंडाळी???) इतके सुंदर दिसते, की त्यात काहीही फरक करणे वेडपटपणाचे ठरेल." साडीबरोबर साडी नेसणाऱ्यांनाही मार्क मिळाले. "भारतीय मुलींचे नाजूक हात, लांब मान (?) व डौलदार चाल यांच्यामुळे त्या 'मॉडेल' म्हणून काम करायला अगदी आदर्श आहेत."

--समीर



## वरदान

शब्दहीन खंत उरी वाढताना काजळते
नेत्री साचणारी व्यथा जीव जाळते जाळते
साकळल्या यातनेस स्वैर उधाणसे यावे
वेदनांना वाणीचे रे वरदान तुवा द्यावे
ज्वालामुखोपरी व्हावा स्फोट मूक वेदनांचा
जीव फोडून निघावा झरा कातर व्यथेचा
उसळत्या भावनांची थांबवाया खळबळ
जित्या जाणिवेला हवी आता यायला भोवळ
शांतवाया चेतलेली आग अशी जीवघेणी
माझ्या मनाला लागावी चिरनिद्रेची ओढणी
नको उरायला आता वेदनांची जाणीवही
झेप घ्यावी हृदयाने गूढ अनंताच्या डोही

*प्रभा गणोरकर*

## अभंग

सांग सांग जनाबाई—
तुवा राबविला देव,
त्याने दळीले कांडीले
कसा होता तुझा भाव ?

अरे नामदेवा तुझा—
कसा रंगला रे काला
तुझ्या इवल्या वाटीत
जगजेठीहि जेवला !

किती कावडी वाहिल्या
तरी रिताच रांजण
नाही आकळली कधी—
एकनाथा तुझी खुण.

सांग पुंडलिका मला—
जादू अशी कशी केली
देव अजूनहि उभा
युगे अठ्ठावीस झाली !

सख्या तुकारामा सांग—
तुझ्या भक्तीची ती कथा
इंद्रायणीत बुडूनी
कशी तरली रे गाथा !

आहो ज्ञानेश्वर देवा—
तुम्ही रेडा वदविला
पाठी फिरवा ना हात
मी तो जन्माचाच हेला !

*लक्ष्मीकांत तांबोळी*



# कर्तबगार भावाची गोष्ट

घड्याळाचा काटा साताच्या पुढं सरकू लागला, की तो बेचैन होतो. प्रत्येक मिनिटागणिक त्याची ही बेचैनी वाढू लागते. मग ती त्याच्या रक्ताबरोबरच साऱ्या शरीरात वाहू लागते. साडेसातपर्यंत तो कसाबसा धीर धरतो व काटे साडेसातवरून पुढे घसरतात न घसरतात, तोच तो पायात चप्पल अडकवू लागतो. थोडीशी सुटी नाणी खिशात टाकतो व स्वयंपाकघरात गुंतलेल्या आईला "आनंदाकडं जाऊन येतो ग," म्हणून सायकल बाहेर काढतो.

बाहेर एव्हाना गडद अंधार झालेला असतो. हा मखमली अंधार त्याला फार आवडतो. देवानं माणसाला दिलेलं अंधार हे फार मोठं वरदान आहे. हा अंधार नसता तर त्याला रोज असं बाहेर पडता आलं असतं का? हा अंधार नसता

# नीच

## काही लहान, काही महान

सौ. लीला श्रीवास्तव

तर जगातली कितीतरी पापं जन्मलीच नसती. मग आयुष्य अगदी बेचव, आळणी झालं असतं.

सायकल तिकडं वळविण्यापूर्वी तो एखाद्या शिळ्या पावाचा तुकडा, एखादअर्धा-कच्चा पेरू किंवा शिळ्या भज्यांची प्लेट कागदात बांधून घेतो. रोज दहा पैशांहून अधिक खर्च तो करीत नाही, पण तेवढ्यातच ती फार खूष असते. तो फारच मूडमध्ये असला तर एखादा बुंदीचा लाडू अथवा दोन गुलाबजाम घेऊन जातो. अघाशीपणं ती एकाच घासात ते गट्ट करून, मग नुसती बोटं चाटू लागली, की त्याला वाटे, की ती फारच उदार आहे.

ती एक अरुंद आडवाट आहे. दिवसासुद्धा कुणी तिचा फारसा उपयोग करीत नाही. मग रात्रीचा तर प्रश्नच नाही अन् म्हणूनच त्याला ती जागा फार उपयुक्त आहे. आमरस्ता तिथून पंचवीस-तीस फुटांवर आहे. जवळच एक अगदी छोटासा पाण्याचा ओहोळ आहे. ओंजळभर पाणी त्यातून मुकाटपणं वाहात असतं. अंधार पडू लागताच आजूबाजूची लहान-मोठी झाडं निवांतपणं झोपी जातात. इथं आल्या-वर जगाचं अस्तित्वच नाहीसं होतं. अस्तित्व असतं फक्त तिच्या गरम पाण्याच्या थैलीसारख्या शरीराचं व त्याच्या शरीरातून शेकडो मैल वेगानं धावणाऱ्या उक-ळत्या रक्ताचं. त्याच्या आधीच ती येऊन पोचलेली असते. अंधारात त्याला ती दिसत नाही, पण तिच्या शरीराचा कुबट वास त्याला अर्ध्या फर्लांगावरच जाणवतो. पाव फर्लांगावर आल्यावर, तेलपाणी नसलेल्या, धुळीनं माखलेल्या केसांचं कराकरा

खाजवणं जाणवतं व त्याहून जवळ आल्यावर तिच्या शरीरावरच्या असंख्य चिंध्यांची फडफड जाणवते ! तो स्टँडवर सायकल उभी करतो न करतो, तोच झाडाआडून पुढं येत ती विचारते, " काय आणलं बाबजो आज ? " व त्याच्या हातातली कागदाची ती पुडी जवळजवळ हिसकावूनच घेते. दातसुद्धा न लावता एकाच घासात ती ते गिळून टाकते. त्याला वाटतं, की तिनं बहुतेक कागदसुद्धा खाऊन टाकला असावा. मग थोडावेळ ती नुसतीच तोंडात स्वाद घोळवीत मिटक्या मारीत राहते.

ज्या दिवशी शिळं, उष्टं खाऊन तिचं पोट भरलेलं असतं, त्या दिवशी ती उगीचच तक्रार करते, " बाबूजी, किती उशीर केलात तुम्ही आज ? " तिचं असं हे तक्रार करणं त्याला मुळीच आवडत नाही. ही कोण तक्रार करणारी ? तिला काय अधिकार असं हटकण्याचा ?

कधी कधी ती त्याच्या गुडघ्यावर डोकं टेकून अंधारात त्याच्या डोळ्यांत पाहण्याचा प्रयत्न करीत कापऱ्या आवाजात विचारते, " बाबूजी, असं रोज येत राहाल न तुम्ही ? " उत्तरादाखल तो तिच्या छातीला जोरात चिमटा घेतो. एकदा तिनं भोळेपणानं म्हटलं होतं, " बाबूजी, माझ्याशी लग्न करा ना तुम्ही. "

तो खूप जोरानं हसू लागला होता. बराच वेळ त्याचं हसू आवरेना, तेव्हा तिला कळलं होत, की आपण काहीतरी फारच मूर्खासारखं बोललो आहोत.

एक दिवस लाडात येऊन तिनं आपलं तोंड त्याच्या तोंडाशी आणलं. एका विचित्र भपकाऱ्यानं त्याला मळमळू लागलं. तिच्या ह्या अगाऊपणाचा त्याला इतका राग आला, की फाडकन त्यानं तिच्या मुस्काटात ठेवून दिली. छप्प ! ध्वनीच्या लाटा उठल्या. खूप वेळ गाल चोळत राहिल्यावर रडक्या आवाजात ती म्हणाली, " बाबूजी, मला तुमचा मुका घ्यावासा वाटला हो. तुम्ही कधीच माझा मुका का घेत नाही ? "

आता हिला काय उत्तर देणार ? म्हणे माझा मुका का घेत नाही ? जन्मल्यापासून बोटावर मोजण्याइतक्या वेळा तरी हिनं तोंड धुतलं आहे, की नाही कोणास ठाऊक ! त्यानंतर तिनं कधी त्याच्या तोंडाजवळ तोंड आणण्याचं साहस केलं नाही.

तिच्याभोवती नेहमी एक कुबट वासाचं आवरण असतं. प्रथम दोन मिनिटं त्याला ते भपकारे अगदी असह्य होतात, पण मग हे अंधाराचं आव्हान, ती झोपेत चाळवाचाळव करणारी झाडं, जवळच निःशब्द वाहणारं पाणी आणि तिचं गरम पाण्याच्या थैलीसारखं शरीर ...... मग त्याला कसलाच वास येत नाही. तिच्या गरम गरम श्वासाची व नरम नरम छातीची त्याच्यावर नशा चढत जाते. मग तो बेहोष होऊ लागतो.

तो परततो, तेव्हा अगदी मरगळून गेला असतो. ती सारी बेचैनी केव्हाच मरून गेलेली असते. परतताना त्याला वाटू लागतं, की आपल्या शरीरातून बहुधा थंड

रक्त वाहात आहे.

आजी किंवा धाकटी बहीण, कुणीतरी दरवाजा उघडा ठेवून त्याची वाट पाहात बसलेलं असतं. आजी कधी कधी त्याला हटकते, " इतका वेळ काय करीत होतास रे ? "

तिच्या नजरेला नजर न देता तो उत्तरतो, " अग, अभ्यास आणखी काय ? "

अंथरुणावर पडल्यावरही तो कुबट वास सारखा त्याच्या नाकासमोर घोटाळत राहतो. त्याला अगदी ओकारी आल्यासारखी वाटते व त्या क्षणी तो निश्चय करून टाकतो, की उद्या तिकडं जायचं नाही.

पण दुसऱ्या दिवशी संध्याकाळचे साडेसात होऊ लागताच पुन्हा तीच बेचैनी...! मग तो मनाला समजावतो; अरे, फक्त दहा पैशांत हे सारं काही मुळीच महाग नाही. फक्त दहा पैसे ! एखादा शिळा पावाचा तुकडा किंवा भज्यांची प्लेट !

ती आज अगदी मूक आहे. तो आल्यावर तिनं कागदाच्या पुडीवर झडप घातली नाही, की उशिरा आल्याची तक्रारही केली नाही. कागदाची पुडी तिनं बाजूला ठेवली आहे व त्याचा हात हातात घेऊन ती त्याच्या डोळ्यांत अंधारात काहीतरी शोधण्याचा प्रयत्न करीत आहे. त्याच्या डोळ्यांतही तिला अंधारच दिसतो, तेव्हा शेवटी निराश होऊन ती त्याचा हात घट्ट धरून ठेवते.

" बाबूजी. " तिच्या आवाजाला आज एक विचित्र धार आहे. " काय ?"

" बाबूजी." तिचा आवाज कापतो आहे. त्याचा हात ती असा घट्ट धरून ठेवते, की जणू कुणी तिला विहिरीत ढकलायला निघाले आहे.

" बाबूजी, बाबूजी काय करतेस ? बोल काय बोलायचं आहे ते."

तो चिडतो.

तरीही ती काहीच बोलत नाही. त्याचा दुसराही हात हातात घेऊन ती आवळू लागते. आता मात्र तो फारच चिडतो व आपले दोन्ही हात सोडवून घेऊन तिला दूर ढकलून देतो. जातीची भिकारीच ! लोचटासारखी पुन्हा जवळ येते. मोठ्या प्रयत्नानं तिच्या तोंडून शब्द बाहेर पडतात, " बाबूजी, मला दिवस गेले आहेत." त्याचा हात ती पुन्हा घट्ट पकडून ठेवते. जणू काही त्याचा असा हात पकडून ठेवण्यानं तो कुठं जाऊच शकणार नाही. त्याला अडकवून ठेवण्याचा तेवढा एकच मार्ग तिला माहीत आहे.

तो दचकतो. असा दचकतो, की जणू काही तो एकदम नंगा झाला आहे व सारं जग त्याच्याकडं टवकारून पाहात आहे, पण क्षणभरच ! दुसऱ्याच क्षणी प्रतिष्ठितपणाच्या आवरणानं तो आपलं सर्वांग झाकून घेतो. त्याला स्पष्टपणे जाणवतं, की आपण एका सन्माननीय वकिलाचे सुपुत्र आहोत व ती आहे केवळ एक तुच्छ भिकारी ! मग आपल्याला हे सगळं उत्तरदायित्व पार पाडायची आवश्यकता काय ? वेळोवेळी तिच्यावर पैसे खर्च करून आपण पूर्ण किंमत चुकविली आहे.

त्याहून अधिक किंमत मागणं म्हणजे निव्वळ हलकटपणा आहे तिचा. नीच कुठली! मला असा पिळून काढायचा विचार आहे सालीचा! हलकट–नीच...मनातल्या मनात तिच्या या नीचपणाची खात्री पटताच झटक्यासरशी आपला हात सोडवून घेत तो ओरडतो, "मग मी काय करू? गावभर शेण खाऊन माझ्यावर नाव घेतेस? जातीचा गुण कुठं जाईल?"

त्याच्या ह्या कांगाव्यानं, आरडाओरडीनं ती अगदी भेदरून जाते. तो एकदम असा कांगावा करील याची तिला तिळमात्र कल्पना नसते. तो असा ओरडू लागला. तेव्हा तिला वाटलं, की आपलंच काही चुकलं असावं. ती त्याचे पाय धरू लागते. "रागावू नका बाबूजी, मी खोटं नाही बोलत. खरंच आहे हो ते!" खिशातून पाच-दहा नाणी काढून मोठेपणानं तो तिच्या हातावर ठेवतो. मग अगदी सहज स्वरात तो म्हणतो, "अग, मग त्यात एवढं घाबरायचं कारण काय? तू जशी या जगात आलीस, तसंच तुझं पोरही येईल या जगात जन्माला; एखाद्या उकिरड्याशेजारी किंवा फार झालं, तर एखाद्या धर्मार्थ इस्पितळात."

पण त्याचं तर्कशास्त्र तिला पटेना. एवढी साधीसुधी गोष्ट तिच्या ध्यानात येईना. तिचे डोळे ओले झाले अन् ओठांतल्या ओठांत ती काहीतरी पुटपुटू लागली.

तो दरवाजा लोटून घरात शिरला पण दरवाजातच चमकून थबकला. खोली-तल्या वातावरणात एक प्रकारचा अस्वाभाविकपणा होता. हवेची चव कडवट होती. खोलीतल्या एकूण एक वस्तू गुन्हेगारासारख्या अंग चोरून आपआपल्या जागी उभ्या होत्या.

धाकटी बहीण खालीच भिंतीला टेकून बसली होती. तिनं आपलं तोंड हातात झाकून घेतलं होतं. त्याला बहिणीचा चेहरा दिसला नाही, पण एवढं कळलं, की ती बहुतेक रडत असावी. कारण राहून राहून तिचं शरीर विजेचा धक्का बसावा तसं हलत होतं.

आजीचा नेहमीचा शांत व सौम्य चेहरा संतापानं विकृत झाला होता. त्याला कळेना, काय घडलं असावं ते. आळीपाळीनं आई व बहिणीकडं पाहू लागला.

त्याला पाहताच आजीच्या संतापाचा पेच थोडा ढिला झाला व तिचा संताप डोळ्यांवाटे पाझरू लागला. बहिणीचं शरीर आणखी जोराजोरानं गदगदू लागलं. तो अधिकच स्तंभित झाला.

"काय भानगड आहे आई?"

संताप, तिटकारा, असहायता, शरम, आकांत...या साऱ्यांचं मिश्रण आजीच्या आवाजात होतं. "या कार्टीनं आपल्या तोंडाला काळं फासलं रे..." आजीनं हंबरडा फोडला.

"म्हणजे?" त्याचा श्वास गुदमरू लागला. मोठ्या मुष्किलीनं त्याच्या तोंडून एवढा एकच शब्द बाहेर पडला.

" दिवस गेले आहेत तिला."

त्याच्या डोळयांसमोर एकदम अंधार पसरला. गडद अंधार ! आजी, बहीण साठ वॅटचा बल्ब...छे...काहीच दिसेना. फार अंधार ! अगदी तसाच अंधार, जसा त्या आडवाटेवर पसरला असतो.

पण दुसऱ्याच क्षणी हा काळाकुट्ट अंधार चिरून टाकणारे, धगधगती आच असलेले शब्द त्याच्या तोंडून बाहेर पडले,

" कोण आहे तो नीच, हलकट, आमच्या तोंडाला काळं फासणारा ! बोल, बोलत का नाहीस ?

वादळात वाळलेलं पिंपळाचं पान कापावं तसं बहिणीचं शरीर कापू लागलं. तिचे मूक हुंदके आता शब्दरूप धारण करू लागले. शे–दोनशे मण वजन लादलेल्या ट्रकखाली कुत्र्याचं पिलू चिरडल्यावर जसं करुण ओरडतं, तसंच काहीसं कारुण्य तिच्या हुंदक्यांत होतं.

आता तो रागानं अगदी बेभान झाला. " कोण आहे तो ? काय म्हणतो तो ? तुझ्याशी लग्न करायला तयार आहे की नाही ?" मोठ्या प्रयत्नानं बहिणीनं आपला हुंदका आवरला व ती कशीवशी उद्गारली, " त्यांना आपल्या वडिलांची भीती वाटते."

" नीच, साला. एका पोरीच्या आयुष्याचा सत्यानाश केल्यावर आता वडिलांची भीती वाटते काय ? नाव सांग. बोल, कोण आहे तो ?

भावाचं हे जमदग्नीसारखं रूप पाहून बहीण भीतीनं अर्धमेली झाली होती. " आनंद, तुझा मित्र आनंद. '

आनंद ! त्याचा जिवाभावाचा मित्र असा निघावा ! ज्याच्या आडोशानं तो आजपर्यंत

मग तो बहिणीला म्हणाला, " तू मुळीच काळजी करू नकोस. त्या हलकटाचा मी चांगला समाचार घेतो. साल्यात तिळमात्र माणुसकी उरली नाही की काय ?"

अन् त्याच पावली तो आनंदकडं जायला निघाला. आई आपल्या ह्या कर्तबगार लेकाकडं व बहीण आपल्या ह्या पाठीराख्या भावाकडं मोठ्या अभिमानानं पाहू लागली !

● ● ●



जगी सर्वसुखी असा
कोण आहे ?

एखादा अविवाहित
असा असण्याची
शक्यता आहे.

परंतु विवाहित ...?

"अहो, उठा ना ! असे काय करावयाचे बाईऽ उठा ना. आठ वाजून गेले. उठा; चहा तयार आहे. तुमची अंघोळ वगैरे झाली, की गरम-गरम पोहे करणार आहे. उठता काऽ गडेऽऽ". "...हूं...हूं...! !"

असे जीवन पाहिजे बुवा ! कसं बरं वाटतं. नुसती कल्पना केली, तर एवढा आनंद होतो, मग प्रत्यक्ष असे जीवन मिळाल्यावर किती आनंद होईल; पण हे सुख सगळ्यांनाच मिळते का ? म्हणजे विवाहितांना हं ! पण शंभरांत ४ ते ५ विवाहितांना ह्या सुखाचा आनंद उपभोगता येत असेल. मग बाकीच्यांच्या बाबतीत असे का घडत नाही ? त्याला कारणे अनेक आहेत. नवरा-बायको संसार ह्या नाण्यांच्या दोन बाजू आहेत. दोन्ही बाजू जेव्हा एकमताने नांदतात; तेव्हाच त्या संसाररूपी नाण्याची किंमत वाढते. त्या संसारात काहीतरी अर्थ निर्माण होतो आणि जेव्हा एखादी बाजू हट्टी, स्वाभिमानी किंवा चिडखोर, अरसिक असेल, तेव्हा मग ही संसाररथाची चाके न राहता ती सायकलची चाके होतात. कधी एक पंक्चर होते, तर कधी एखादे 'आऊट' असते आणि शेवटी त्यातील फक्त एकाला 'चेन'. मूळ संसाराची सायकल फरफटत चालवावी लागते. मग ह्यात काही वेळेला स्त्रीची चुकी असते, तर काही वेळेला पुरुष चुकत असतो; पण स्त्रियांना वाटते, आपण करतो ते सारे चांगले; आपलेच विचार पुरुषांनी अमलात आणावे आणि ह्याउलट नेमके पुरुषांना वाटत असते. पण प्रत्येक वेळेलाच मनासारखे घडले म्हणजे काय ? म्हणून दोघांनी विचार करून जर चालण्याचे ठरविले, तर संसार हा मोडकी-तोडकी सायकल न होता, चांगला भव्य व वजनदार जगन्नाथाचा रथच

# संसारगाथा

दत्तात्रय जनार्दन जोशी

होईल. जाऊ दे ! तुम्ही पुराण ऐकून कंटाळला असाल. तुम्ही म्हणाल, "स्वतःचे अजून लग्न झाले नाही, म्हणून. "घरोघर मातीच्या चुली." हां ! हां ! इथेच चुकता तुम्ही मंडळी ! आपण विसाव्या शतकात वावरतोय ! अहो, आता विजेच्या चुली, वातीचा स्टोव्ह व गॅस. या विजेच्या शेगडीचा केव्हा फ्यूज जाईल, त्याचा नेम नाही. वातीचा स्टोव्ह नेहमीच वात देतो. गॅस म्हणजे सगळीच हवा तंग; मग यावर चाललेला संसार तरी कसा सिधा असेल बरं ! आमच्या मित्रांचे संसार बघून आनंद वाटतो. प्रत्येकजण आमच्याच विचाराचे, म्हणजेच एका माळेचे... सगळे लग्न होण्याच्या अगोदर म्हणत होते...जाऊ द्या ! पण मे महिन्यासारख्या रखरखीत उन्हाळयात या संसार-भवसागराला जेव्हा भरती येते, तेव्हा प्रत्येक तरुण उमेदवार यात उडी घेतो. भेटला की म्हटतो, 'अरे ! आईचा हट्ट !' कुणी म्हणतो, 'अरे, आमच्या चुलत्यांनी अगदी खूप हट्टच धरला, म्हणून मी लग्नाला उभा राहिलो ! तर कुणी छाती पुढे करून सांगतो, 'म्हटलं, बघूच, लग्न लग्न काय चीज आहे ?' असे करून बहुतेक सगळे संसारार्थी झाले. आता आम्हाला हट्ट करणारे कुणीच नाहीत; पण आमचे मन आता हट्ट करते आहे. बघू...हळूहळू... आता आमच्या रमूच्या घरी जाऊया, म्हणजे त्याच्या घरात नव्हे हं ! जरा आजूबाजूला राहू या !

आमच्या वहिनी विजूबाई,–म्हणजे–रमूची बायको. लग्नाला एक वर्ष झाले. वहिनी नोकरी करतात, पण रमूला ते पसंत नाही. त्याचे म्हणणे, "लग्नानंतर स्त्रीने नोकरी करणे म्हणजे, घर लॉजिंग-बोर्डिंग वाटते. एखादे दिवशी घरी लवकर



येऊन आयत्या चहाची अपेक्षा करावी, तर ही आलेली नसते. कधी हिची ' लोकल ' चुकते, तर कधी ओव्हर टाईम असतो. बरे, तिला आल्यावर चहा करणे मागणे बरे दिसत नाही. कारण ऑफिसमध्ये किती काम असते, ह्याची मला कल्पना असते. सकाळी लवकर उठावयाचे म्हणजे, रात्री गप्पा मारत बसण्याची सोय नाही. घरात पसारा तसाच असतो. मग रविवार तो आवरण्यात जातो. असे आज वर्षभर चालले आहे. धड तिला सुख नाही, मला सुख नाही. मी वैतागलेला व ती वैताग-लेली. एखाद्या रविवारी सिनेमाला जावयाचे म्हटले, तर तिच्या मैत्रिणी येणार असतात "... म्हणून त्याचे आपल्या बायकोने नोकरी करू नये हे मत. वहिनींनी आपले मत सांगितले. त्यांचे म्हणणे, " जरा होईल त्रास, म्हणून काय एवढी मोठी पगाराची नोकरी सोडावयाची ? बरे, त्यातून आजचे महागडे जीवन. संसाराला जरा आर्थिक हातभार लागतो. आजकाल लोकांना नोकऱ्या मिळत नाहीत आणि त्यात एवढी चांगली नोकरी का म्हणून सोडावी ?"

आता दोघांचे विचार ऐकल्यावर आपल्याला दोघांचे विचार पटतील. रमूने जरा विचार करून थोडी माघार घेऊन विजूला नोकरी करू द्यावी किंवा विजू-बाईंनी नवऱ्याच्या सुखाकडे लक्ष देऊन नोकरी सोडावी, पण असे घडले तर मग संसार कसला ? ही दोन्ही रथचक्रे अशीच कुरकुरत राहणार.

आता आमचे हे दुसरे संसारार्थी सदानंद इनामदार. ह्यांचेकडे बरेच सुख नांदते आहे, पण त्याला गालबोट म्हणजे त्यांचा नादिष्टपणा. सुटी म्हणून कधी घरी सापडतील ? छे ! सुटीच्या आदल्या रात्री जी रमी चालू व्हावयाची, ती अखंड

सुटीचा दिवस. बाकी ते सौ. ला ती म्हणेल ते पातळ, वेणी, कापड वगैरे आणत असत. लहर लागली, तर रजा काढून सिनेमाला नेत असे; पण रमीचे वेड जबरदस्त. बायको ओरडावयाची, "अहो, जरा घरी बसा. आम्ही केलेल्या गोष्टींचे, पदार्थांचे कौतुक करा. बाजार, भाजी वगैरे काही आणावे. रात्रीचे जाग्रण करावयाचे आणि मग डोळे दुखतात, डोके दुखते, करत बसावयाचे. पत्ते खेळा, पण त्याला काही मर्यादा." यावर सदू म्हणतो, "सुटीत करावयाचे काय ? उशाखाली हात घालून आढ्याकडे बघत बसावयाचे ! बरे, बाहेर जाण्याचा अगदी कंटाळा येतो. रोज रोज ती 'लोकल' बघून जीव नुसता उबून जातो. कुणाकडे जाणे म्हणजे त्यांना संकट. एक रविवार मिळावयाचा त्यात आमची अडचण. मग यातून एकच मार्ग म्हणजे रमी खेळत बसणे."

इथेसुद्धा दोघांचे म्हणणे आपल्याला पटेल, पण इथे सदू चुकतो. कसा ! अरे, पत्ते खेळण्यास हरकत नाही; पण रविवारी लवकर उठावे, पाणी वगैरे भरून, भाजी आणून, स्नान उरकून मग दुपारी ४ ते ८–९ पर्यंत खेळावे आणि प्रत्येक सुटीला खेळलंच पाहिजे, असे कुठं आहे. एखाद्या रविवारी सिनेमाला जावे. काही वेळेला आपणास आवडत नसले, तरी जावे. जर बायकोला सुखी ठेवाल, तर तुम्ही सुखी, तुम्ही सुखी तर संसार सुखाचा; पण असे बायकोचे ऐकल्यावर नवरा कसला ! 'मी' पणा तो काय राहिला ? मग बायको दुःखी व ते दुःख घालवण्यासाठी एखाद्या दिवशी अचानक रजा काढून सिनेमा, फिरणे, जेवण बाहेरच. बायको बिचारी आनंदते. तिला बिचारीला काय कल्पना, की ही पुढच्या शनि.-रवि.-ची


स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

**शर्मा स्वीट मार्ट**

दत्त मंदिराशेजारी,
मंडई रस्ता, पुणे २.

रमीची नांदी आहे. शनिवार–रविवार नवऱ्याचे प्लस-मायनस चालूच. मग एवढे झाल्यावर नवरा-बायकोंची मने कधीच 'प्लसात' येणार नाहीत आणि संसाराची रंगरमी नेहमी एका 'कनेक्टिंग' पानासाठी अडून राहणार. शेवटी आढावा घ्यावा तर सगळेच 'मायनस'.

मुकुंद आणि हेमासारख्या जोडया फारच थोडचा हं! मुकुंद व हेमाचा प्रेम-विवाह झालेला आहे. एक नाही, दोन नाही, पाच वर्षे तो संसार करतो आहे, पण कधीही दोघांच्या चेहऱ्यावर उदासीनता नाही आणि भांडण कधीच नाही. तुम्ही म्हणाल, 'अहो, भांडणाशिवाय कसे चालेल?' बरोबर आहे! मंडळी, प्रश्न अगदी योग्य आहे. भांडयाशेजारी भांडे ठेवले म्हणजे, ते वाजणारच. पण भांड्याला अगदी पोचा येईतो तो आदळत नाहीत. थोडा वाद-विवाद, रुसणं-रडणं पाहिजेच! त्याशिवाय मजा नाही. मुकुंदा-हेमा व त्यांची दोन बालके सुखी आहेत. हेमा श्रीमंतीत वाढलेली, म्हणून थोडी हट्टी आहे, पण मुकुंदा मनाचा श्रीमंत असल्या-मुळे दर वेळेला तिला समजुतीने वागवतो. त्याचे म्हणणे असे, "उगीच गोष्ट क्षुल्लक असताना त्यावरून वाद वाढवावयाचा, मग तिने काहीतरी बोलावे, आपण चिडून जाऊन बडबड करावी, यात अर्थ नाही. मग तिची समजूत काढीत बसा-वयाचे त्यापेक्षा आधीच, 'वरं बाई तुझं खरं!' म्हणून मोकळं व्हावं. ती खूष!" तुम्ही म्हणाल, "दरवेळेला असे होत गेल्यावर बायको डोक्यावर बसावयाची!" तर मुकुंदा म्हणतो, "योग्य ठिकाणी ती गोष्ट झाली पाहिजे, म्हणजे झालीच पाहिजे! त्या गोष्टीचं महत्त्व आपण 'सौ.' ला समजावून सांगितले तर मग ती कशाला विरोध करील." अजून पुष्कळ मित्र आहेत, पण त्यांतील हे नमुने दिलेत. आमचे मित्र तसे दिलदार हं! आता मी एवढे लिहिले ना, तरी माझ्यावर रागाव-णार नाहीत. त्यांना माहीत आहे; आमच्यासारखे असंख्य आहेत. जे सर्वांना लागू, ते कुणालाच लागू नाही! मी पण विचार करतो, की काय करावयाच्या आहेत लोकांच्या उचापती? ज्याचे त्याला कळेल, तेव्हाच खरी सुधारणा होईल. अहो! असे वाचून आणि प्रवचने ऐकून जर लोक सुधारतील, तर मग सगळीकडे सुख-शांती नांदेल. व्यक्ती तितक्या प्रकृती! जाऊ देत झालं... पण असे म्हटले तरी, जरा सगळीकडे सुखशांती दिसली म्हणजे जरा बरं वाटते. कथालेखक व. पु. काळे सांगतात, की संसार करंजीसारखा असावा! म्हणजे बेताचा वाकडा, बायको सारणासारखी सुखी– अंगाने भरलेली आणि नवरा पापुद्र्यासारखा. रागावला तर करंजी मोडेल अशी भीतीही हवी. ●



## अंगांतल्या व हवेंतल्या
# **उष्णतेच्या तक्रारीं** साठीं
# **पर्ल काढा** कुटुंबांत
## सर्वांच्या उपयोगी पडतो

असा गेल्या चाळीस वर्षांचा अनुभव आहे. सर्व अंग आंतल्या आंत रसरसणें, डोळ्यांची व हातापायांच्या तळव्यांची जळजळ, उन्हाळ्याचा त्रास, पचनेंद्रियें कमजोर होऊन वारंवार अपचन, पोट दुखणें-फुगणें-जड होणें, शौचाला केव्हांच साफ नसणें, नेहमीं अगदीं थकल्यासारखें वाटणें वगैरे उष्णतेच्या तक्रारी शीतल, शक्तिवर्धक, आरोग्यदायक पर्ल काढा जलद दूर करतो. काढा या नावामुळें घाबरण्याचें कारण नाहीं. पर्ल काढा चवदार लागतो. वर्षांतून एक दोन वेळां पर्ल काढ्याच्या ४।५ बाटल्या घेतल्यास प्रकृती उत्तम राहते. पर्ल काढा पुरुषांप्रमाणेंच नाजुक प्रकृतीच्या स्त्रियांना व मुलांना विशेष उपयोगी पडतो. स्त्रियांनीं गरोदरपणीं सुद्धां निर्धास्त घ्यावा. केव्हां दिवसपाळी केव्हां रात्रपाळीमुळें हटकून होणारें अपचन, पित्त, मलावरोध घालवून प्रकृती चांगली ठेवण्यासाठीं पर्ल काढा पुष्कळ मंडळी वापरतात. आपल्याकडच्या उष्ण हवेंत साहजिक उद्भवणाऱ्या उष्णतेच्या तक्रारींसाठीं पर्ल काढा घ्या.

# **उष्णतेच्या तक्रारीं** चा
## अनुभविक उपाय **पर्ल काढा**

## **पर्ल कंपनी, मुंबई २७.**

Stusa 4/64




# पगली

**प्रभाकर धोटे**

सार्‍या गावात ती चर्चेचा विषय होती.
तोकडी चड्डी घालून खेळायची प्रथा गावात नव्हती.

प्रायमरी शाळेच्या मास्तराच्या मुलाला मिळवणं शक्य होतं तेवढं मी आयुष्यात मिळवलं होतं. अधिक काही मिळवावं अशी इच्छाही नव्हती अन् खरं सांगायचं म्हणजे तेवढी कुवतही नव्हती.

पहिल्याच संधीला मॅट्रिक पास झालो अन् वेलफेअर खात्यात चिकटलो. मला साजेशा रूपाची, वळणाची अन् स्वभावाची बायको लाभली. दोन गोड नसली तरी बर्‍यापैकी मुलं झाली. मला कशाची खंत नव्हती, की अधिक कशाची अपेक्षा नव्हती. माझी बायको समाधानानं प्रपंच करी. माझ्या संसारात असंख्य अडचणी येत असूनही मी संतुष्ट होतो.

नाकासमोर सरळ चालणार्‍या माझ्यासारख्या गरीब कारकुनानं आयुष्यात कुणावर प्रेम केलं असेल, ही गोष्ट सांगूनही कुणाला खरी वाटणार नाही. कुणाला कशाला,मला स्वत:लाच बरेचदा वाटतं, की तो आपल्याला झालेला भास असावा, पडलेलं स्वप्न असावं, पण जेव्हा जेव्हा रायसाहेब रायपूरला येतात, मला भेटतात. तेव्हा तेव्हा वाटतं, की तो भास नव्हता, स्वप्न नव्हतं, ते एक सत्य होतं.

माझ्या संसारात मी सारं विसरून गेलो. आता त्या आघाताची आठवण अन् जखमेच्या व्रणाचादेखील मागमूस राहिला नव्हता. अचानक ह्या सार्‍या गोष्टी आठवायला आमचे गुप्तासाहेब करणीभूत झाले. त्या दिवशी त्यांनी मला बोलवलं अन् म्हणाले——

" जोशी, तुम्हाला रायपूरला आजच्या आज जावं लागेल. कोर्ट केस आहे उद्या अन् माकडे पडले आहेत आजारी." मी त्यांना रुकार दिला.

रात्री गाडीत बसल्यावर कितीतरी आठवणींनी माझ्या मनात पिंगा घालायला



सुरवात केली. तब्बल एका तपानंतर मी रायपूरला जात होतो. मी जन्मलो, शिकलो, रायपूरलाच. रायसाहेब वर्मांच्या वाड्यातील एका तीन खणी खोलीत माझ्या आयुष्याची बावीस वर्षे मी काढली होती.

मी मनातल्या मनात ठरवलं, की काम झाल्यानंतर रायसाहेबांना भेटायचं. कमल असेल का ? रायसाहेब साऱ्यांबद्दल माहिती सांगत, पण कमलचा विषय निघाला, की विषय बदलीत. मला त्याचं आश्चर्य वाटे, पण पुन्हा पुन्हा विचारणं बरं नाही, ह्या विचारानं मी तो मोह टाळीत असे. तिचंही लग्न झालं असेल. मुलं असतील. ती सुखात असेल. शेखर नावाचा कुणी इसम आहे, ह्याची तिला कल्पनादेखील नसेल, पण मला हे शक्य वाटेना.

कारण कमलचा लग्न ह्या संस्थेवर विश्वासच नव्हता. तिला न पटणारी कल्पना होती ती आणि कमल एवढी जिद्दी होती, की मनात आणलं ते ती परिणामाची पर्वा न करता करीत असे.

मला अजून आठवतो तो प्रसंग. कलेक्टर शशीमोहनच्या मुलाबरोबर बॅडमिंटन खेळायला ती जात असे. रायसाहेबांच्या मनाविरुद्ध. कधी कधी मला घेऊन जाई. अगदी ओढून नेल्यासारखं; पण मला त्या खेळात गम्य नसल्यानं मी आपला मासिक चाळीत गप्प बसून राहत असे. त्या दिवशी लागोपाठ तीन गेम खाल्ल्यावर ती नर्व्हस झाली. आपल्या स्वभावाविरुद्ध.

लिंबाचं सरबत पिता पिता कलेक्टरसाहेबांचा मुलगा म्हणाला, "देखिये, आप साडी पहेनती है न; असिलिये स्वीफ्ट मुव्हमेंट नही हो पाती." त्याच वेळी कमलनं दोन अर्ध्या पॅन्टस् शिवायचं निश्चित केलं.

रायबहादुरांना कमलशिवाय दुसरं अपत्य नसलं तरी त्यांनी तिच्या या बेताला संमती दिली नसती. साऱ्या गावात ती चर्चेचा विषय झाली असती. कारण तोकडी चड्डी घालून खेळायची प्रथा त्या शहरात रूढ झालेली नव्हती. अगदी मागासलेलं गाव होतं ते.

रायसाहेबांच्या चोरून तिनं चड्ड्या शिवून घेतल्या अन् त्या घालून ती सायकल-वरून शशीमोहनांच्या घरी गेली, त्या दिवशी तिच्या मांसल पोटऱ्या अन् मांड्या शहराच्या चर्चेचा विषय झाल्या होत्या.

तिच्यातला हा अवगुण मान्य करूनही कमल मला आवडत असे. बऱ्याचदा आपला अपमान होतो आहे, हे लक्षात येऊनही मी ती सांगे, तसा वागत असे. आता हसायला येतं, पण त्या वयात मी तिच्यावर डझनभर कविताही केल्या होत्या, अर्थात तिनं त्याची दखल घेतली नाही, ही गोष्ट वेगळी.

एका चांदण्या रात्री कमलला बाहेर फिरायची हुक्की आली. रायसाहेबांच्या परवानगीनं मी सोबत म्हणून गेलो. कमल सरोवराकडे निघाली. पाळीव मांजरा-सारखा मीही निघालो.

किनाऱ्यावर ठेवलेल्या बाकड्यावर ती बसली. शांत पाण्यात पडलेलं चंद्रबिंब नाचत होतं. त्या नीरव शांततेत माझ्या मी मला हरवून वसलो. तिच्या माझ्यातील अंतराचा आतापर्यन्त राखलेला विवेक संपला. तिचा दर्जा, माझी स्थिती ह्याचा मला विसर पडला. काहीतरी काव्यमय बोलायची मला लहर आली. मनात कुठं-तरी खदखदणारं सांगून टाकावंसं वाटलं.

तिचा स्पर्श मला नवखा नव्हता. अनेकदा खेळताना मी तिचे साईसारखे मऊ हात धरले होते, पण कधी मन गांगरले नव्हते, की शरीर थरथरले नव्हते, पण आज तो अनुभव येत होता. त्या स्पर्शाची जादू मला जाणवत होती. तो स्पर्श मला चढत होता. दारूसारखा.

बराच वेळ इकडची तिकडची बोलणी संपल्यावर मी धीर धरून म्हणालो,

'कमलिनी.'

ती दचकली. वाज्याच्या पेटीसारख्या चढत्या सुरात हसत म्हणाली,

"आज नाटकी ढंगाचं बोलणार का रे बाबा तू." मी लाजलो. "हसू नकोस. सिरीयस हो. मला तुझ्याशी महत्त्वाच्या विषयावर बोलायचं आहे,"

"हं, बोल."

अन् ती डोळे मिटून लांब चेहरा करून बसली. एखाद्या तत्त्वज्ञान्यासारखा. एरवी तिच्या हावभावांना पाहून हसायला आले असते, पण त्यावेळी मी त्याची दखल घेण्याच्या मनस्थितीत नव्हतो.

मी चाचरत म्हणालो,

"कमा-मला असं म्हणायचं आहे..."

" हं हं. "

" नाही, तू गैरसमज— "

" अेहेरे, प्रस्तावनाच करशील, की काही बोलशील ! "

" कमा, माझं ..."

" तुझ्यावर प्रेम आहे असंच की नाही ! "– अन् खदखदून हसली. एखाद्या पक्षाच्या किलबिलाटासारखी.

तिनं नकार दिला असता, तरी मला जेवढं दुःख झालं नसतं, तेवढं तिच्या हसण्यानं झालं. त्यात उपेक्षा होती. माझा चेहरा उतरला. मी अपमानानं थिजून गप्प होतो.

कमल अजून हसतच होती. " प्रेम कशासाठी करतात रे ? " तिनं बाँबगोळा टाकला.

" कशासाठी म्हणजे प्रेमासाठी—सुखासाठी. "

" सुख ? कोणतं सुख ? शरीरसुखच की नाही ?"

" मानसिक सुख. "

" ढोंग आहे. थोतांड आहे सारं– "

" शरीरसुखच हवं तर प्रेम—लग्न हे बुरखे हवेत कशाला ?" अन् तिनं अनपेक्षितरीत्या माझ्या ओठांवर ओठ टेकवले. ती म्हणाली, " लग्नाशिवाय मी ते तुला द्यायला तयार आहे. आहे तयारी ? "

तो किळसवाणा प्रस्ताव ऐकून मी शहारलो. माझ्या प्रेमाबद्दलच्या साऱ्या नाजूक कल्पनांच्या ठिकऱ्या उडाल्या. संस्कारात वाढलेलं माझं मन चिडलं. मला त्या क्षणी कमलबद्दल अतिशय घृणा वाटली.

" कमल, मी जातो–"

" थांबरे मी येते. अगदीच हा आहेस –! " साऱ्या रस्ताभर आम्ही मुक्यासारखे चालत होतो. कमल बोलायचा प्रयत्न करीत होती, पण मी दखल घेतली नाही.

अशी ही कमल लग्न करील, स्वतःला लग्नाच्या बंधनात अडकवून घेईल, असं मला वाटत नव्हतं. तिच्या आजोबांनी वुईल करून बराच पैसा तिच्या नावे ठेवला होता. तो अन् तिचं सौंदर्य तिला हवं ते मिळवून द्यायला समर्थ होतं.

पहाटेची धुसर वेळ होती. गाडी रायपूर स्टेशनात शिरत होती. रायपूर कितीतरी बदललं होतं. कदाचित मी बदललेला असेन.

संध्याकाळी काम आटोपल्यावर मी रिक्षा नयापारात घ्यायला सांगितला. रायसाहेबांच्या वाड्याला अवकळा आली होती. माझ्या ओळखीचा एकही चेहरा मला आजूबाजूला आढळला नाही. फक्त घरं तेवढी बदलली नव्हती.

मी चौकीच्या कट्टयावर बसलेल्या एका इसमाला विचारलं,

" रायसाहेब वर्मा यही रहते है न ? "

" हां, मगर बिमार है – "

" उन्हे बताओ शेखर जोशी आये हैं–"

दोन मिनिटांत मला तो रायसाहेबांच्या कमऱ्यात घेऊन गेला.

तीन वर्षांपूर्वी मला रायसाहेब भेटले होते. त्यानंतर आज त्यांची भेट होत होती. धिप्पाड प्रकृतीचे रायसाहेब खंगले होते. अस्थिपंजर झाले होते.

मी वाकून त्यांच्या पायाला स्पर्श केला, तेव्हा ते भारावले.

" कहो बेटा, ठीक तो हो. "

" जी. "

" रायसाहब, कमल कहाँ है. उसकी शादी हुओ होंगी. ", रायसाहेब दोन मिनिटं स्तब्ध राहिले. डोळ्यांच्या कडा ओलावल्या, तरी त्यांनी अश्रू तसेच ओघळू दिले.

त्यांनी सांगितलेली हकीकत ऐकून मी अधिकच बुचकळ्यात पडलो. दोन जिवांची अशी वाताहात झालेली पाहून वाईट वाटलं.

कमल वेड्यांच्या इस्पितळात दाखल केली गेली होती. खावं, प्यावं, मजा करावी, अशा फुलपाखरी वृत्तीच्या मागे अशी कोणती चिंता होती, व्यथा होती, की त्याचा वेडं होण्याइतपत परिणाम व्हावा ? रायसाहेबांचं सांत्वन कसं करावं ते मला कळेना. शब्द लंगडे पडले म्हणून मी त्यांचे हात हातात घेत म्हणालो,

" इजाजत दिजिये. वक्त मिला तो कल आऊंगा. "

दुसऱ्या दिवशी मी तडक रिक्षा केला अन् वेड्यांच्या इस्पितळाकडे गेलो.

कमलला भेटू द्यायचं डॉक्टरांनी कबूल केलं, पण सावधगिरी बाळगायलाही सांगितलं. अंगावर धावून यायची तिला सवय आहे, म्हणून सावध राहायला सांगितलं.

मी वाट पाहात असतानाच वॉर्डरनं कमलला आणलं. कमल कितीतरी बदलली होती. डोक्यावरचे सार केस रुपेरी झाले होते. एकेकाळी सफरचंदासारखे वाटणारे गाल संत्र्याच्या वाळल्या सालीसारखे रखरखीत सुरकुतलेले अन् सपाट झाले होते.

" कमल, मला ओळखलं ? " मी विचारलं. तिच्या चेहऱ्यावर ओळखल्याच्या काहीच खुणा दिसत नव्हत्या.

" मी शेखर..." मी माझी ओळख करून दिली. तरी ती स्तब्ध होती. एकटक पाहात होती.

पंधरा मिनिटं थांबवूनही ती माझ्याशी एकही शब्द बोलली नाही. जड पावलांनी मी डॉक्टरांच्या केबिनकडे वळलो.

" डॉक्टर– कमलला वेड कशामुळं लागले ? "

" प्रेमभंगामुळं त्यांच्या डोक्यावर परिणाम झाला. " डॉक्टर सांगतच होते.

" रायपूरला मागं एक सर्कस आली होती. त्यात रामरतन नावाचा खेळाडू होता. रायसाहेबांच्या लांबच्या नात्यातला होता. रामरतन खरोखर मदनासारखा

सुंदर होता. कमल साहजिकच आकर्षिली गेली. ताळतंत्र सोडून दोघेही वागत. तशी ती नेहमीच वागे. रायसाहेबांनी कमलला विचारलं – " त्याच्याशी लग्न करशील ? " कमल लग्नाला तयार होती. रायसाहेबांना आनंद झाला होता; आता-तरी पोरीचे हात पिवळे होतील म्हणून ! कमल ही त्यांच्या आयुष्यातलं एकमेव सुख होतं...तशीच ती त्यांच्या अनेक दु:खांचं कारणही होती.

त्यांनी रामरतनला लग्नाबद्दल विचारलं, पण त्याचं म्हणे आधीच लग्न झालेलं होतं अन् त्याचं त्याच्या बायकोवरही अतिशय प्रेम होतं ! दुसरं लग्न करायला तो तयार नव्हता. रामरतन म्हणाला, " माझं लग्न झाल्याचं कमलला माहीत होतं. "

सर्कस गेली. त्याच दिवशी कमल आजारी पडली. दोन महिने तापानं फणफणून होती. रामरतन फारच मोठा आघात करून गेला तिच्यावर.

ती बरी झाली नाही. वेड्यासारखे करू लागली.

खिन्न अंत:करणानं मी डॉक्टरांना नमस्कार केला अन् गाडीला चार तास अवकाश होता, तरी स्टेशनचा रस्ता धरला.


• • •


परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस

सहा साहसे — दा. सी. देसाई

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २ .




# नाझी

## भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

उत्तरार्ध :

लेखांक सहावा.

प्रत्येक दिवशी ३० ते ४० मैलांचे अंतर कापीत जनरल गुडेरीनच्या पॅन्झर तुकड्या २० मे, १९४० ला ॲबरव्हील या फ्रेंच किनाऱ्यावरील बंदराचा कबजा करून बसल्या. ॲबरव्हील ते सेडान अशी प्रचंड पाचर दोस्त सैन्यात आता बसली. उघड्या मैदानातून वेगाने पुढे सरकणाऱ्या जर्मन टँक्स्ना विरोध असा मुळी झालाच नाही. टँकस् चालविणारे सैनिक पुढे सरकताना आसपास

जमलेल्या फ्रेंच नागरिकांना ' टाटा ' करीत दिमाखाने पुढे पुढे सरकत राहिले. फ्रेंच जनता हा प्रकार पाहात स्तिमित झालेली होती. जे तुरळक फ्रेंच सैन्य वाटेत पकडले गेले, त्यांना रस्त्यातून पुढे घालून हे सर्व जर्मन सैन्य अॅवरव्हीलपर्यंत पसरले.

जनरल वेंगाँ हे सरसेनापतीच्या अधिकारपदावर येताच त्यांनी उत्तरेकडील आघाडीवर प्रत्यक्ष जाण्याचे ठरवले. ज्या विमानाने ते प्रवास करीत होते, ते विमान जर्मनांनी पाडले, परंतु वेंगाँ त्यातून बचावले व दुसऱ्या विमानाने यप्रेस येथे पोहोचले. ब्रिटिश सेनानी लॉर्ड गोर्ट यांना वेंगाँ येत असल्याची कल्पनाही नव्हती. लॉर्ड गोर्ट यांना भेटलेले फ्रेंच जनरल विलोट् हे मोटार अपघातात या गडबडीत ठार झाले. जनरल वेंगाँ यांना पाठवलेला लॉर्ड गोर्ट यांचा संदेश त्यांचे-पर्यंत पोचलाच नाही. सगळा गोंधळ माजला होता. लढाई द्यायची, की माघार घ्यायची ? कुठले शहर लढावावयाचे ? फ्रेंचांनी कुठे नेट द्यायचा ? ब्रिटिशांनी काय धोरण पाळावयाचे ? कुणाचा पायपोस कुणाच्या पायात नव्हता. तासातासाला जर्मन सैन्याचे दडपण वाढत होते आणि दोस्तांच्या सैन्याला तर कुणी शास्ताच उरला नव्हता.

दि. २२ मे ला चर्चिल पुन: पॅरिस येथे आले. जनरल वेंगाँ याने आपली प्रति-काराची योजना त्यांना सांगितली. आरस (Arras) या शहराच्या दिशेने उत्तरे-कडील दोस्त सैन्याने रेटा द्यावा, म्हणजे जर्मन सैन्याचा महत्त्वाचा भाग दिशा बदलून लढाईला सिद्ध होईल व याचक्षणी दक्षिणेकडून म्हणजे जर्मन सैन्यात पिछाडीकडून फ्रेंच सैन्य मोठ्या संख्येने मुसंडी मारून सोमे--आरस ह्या रेषेवर भगदाड पाडील !

चर्चिल यांनी या युद्धव्यूहाला एकदम संमती दिली--मात्र लॉर्ड गोर्ट यांना इशारा दिला, की आरसवर रेटा देताना डंकर्कपर्यंतचा मार्ग निर्वेध राहील, याची काळजी घ्या ! जनरल वेंगाँ यांचे वय यावेळी ७३ वर्षांचे होते. अशा वृद्धावस्थेतही त्यांनी या योजनेविषयी बरीच आशा दाखवली व ते झपाट्याने कामाला लागले. जनरल गॅममीन याने १६ मे ला नेमका हाच व्यूह रचण्याच्या आज्ञा सोडल्या होत्या. १६ मे ते २२ मे हे दिवस जर्मन सैन्य माशा मारीत थोडेच बसणार होते ? आता सगळाच उशीर झाला होता.

आरसकडे रेटा देऊ पाहणाऱ्या ब्रिटिश सैन्याला खडे चारले, ते एका प्रथमच प्रकाशात येणाऱ्या जर्मन सेनानीने ! रोमेल ! जनरल रोमेल याने ब्रिटिशांचा आरस येथील लढाईत पाडाव केला व ब्रिटिशांना एक इंचभरही पुढे सरकू दिले नाही. या चार दिवसांत गुडेरीनने मात्र बोलोन्चा कबजा केला व कॅलेला याने विळखा घातला होता.

चर्चिल, अँथनी इडन व आयर्नसाईड या तिघांनी निर्णय घेतला. काही झाले, तरी कॅले बंदर लढवलेच पाहिजे.

दि. २२, २३, २४ कॅले लढत राहिले. येथे ब्रिटिशांनी जिवावर उदार होऊन लढा दिला. हानीची पर्वा न करता दोस्त सैन्ये येथे लढली......

जर्मनांनी दुसरा डाव टाकला. आतापर्यंत बेल्जममधून पुढे घुसलेली सैन्ये जोर करीत नव्हती. कॅलेचा फास बसेना हे पाहताच बेल्जममधून जर्मन सैन्याने जोर केला व रेटा वाढवीत ते डंकर्कपासून ३० मैलांवर आल्याचे वृत्त २४ मे या दिवशी ब्रिटिश सेनानी लॉर्ड गोर्ट यांना मिळाले. याचा अर्थ स्पष्ट होता, की बेल्जम फार तर दोन–तीन दिवस तग धरील व अखेर शरण जाईल !

ब्रिटिश सेनानी लॉर्ड गोर्ट यांनी यावेळी महत्त्वाचा लष्करी निर्णय घेतला. सोमेच्या दिशेने रेटा देण्याचा जनरल वेंगाँ यांच्या योजनेतील हा भाग आता आवाक्याबाहेर गेला आहे, हे त्यांनी ओळखले व २५ तारखेला सायंकाळी ६ वाजता त्यांनी सैन्याला डंकर्कभोवती कडे करीत मागे सारण्याचा आदेश सोडला. डंकर्कच्या दिशेने चोहोबाजूंनी ब्रिटिश–फ्रेंच फौजा आकसू लागल्या,

कॅले या त्रिकोणाचा एक बिंदू होता. डंकर्क हा दुसरा बिंदू व लिली शहर हे तिसरा बिंदू होते. या त्रिकोणाकृती भूभागात सर्व दोस्त सैन्य कोंडीत सापडले होते व जेवढे वाचेल, तेवढे सैन्य डंकर्कमार्गे बाहेर काढण्याचा निर्णय लॉर्ड गोर्ट यांनी घेतला होता.

## गोअरिंगचा बदसल्ला

दि. २६ ला कॅले बंदर ब्रिटिशांनी सोडले. दि. २४ ते २६ मे या दोन दिवसांत हिटलरने या दुसऱ्या महायुद्धातील पहिली लष्करी घोडचूक केली.

२४ मे १९४० ला जनरल गुडेरीनला आज्ञा मिळाली, की पुढे सरकू नका. ही आज्ञा स्वत: हिटलरने दिली होती आणि याच्यामागे हात होता, तो जर्मन गोअरिंग याचा ! गोअरिंग याने हिटलरच्या कानात असे भरवले, की ज्या त्रिकोणात दोस्त सैन्य कोंडले गेले आहे, तो इतका लहान आहे, की आता तो अधिक लहान झाला, तर लुफ्तवाफच्या हल्ल्यात जर्मन सैन्यावरही बाँबफेक होईल ! आता या त्रिकोणात कोंडलेल्या सैन्याचा फडशा पाडायला जर्मन सैन्याची जरूर नाही. माझे विमानदल या सैन्याचा फडशा पाडण्यास समर्थ आहे.

जनरल हालडर, गुडेरीन, वाऊश हे सर्व सेनानी या निर्णयाशी सहमत नव्हते. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे गोअरिंग याचा हा डाव होता. त्याला आता विजयाचे श्रेय उपटावयाचे होते. गुडेरीनच्या पॅन्झर फौजा सीमेच्या दक्षिणेस लागतील. मग त्या इथे डंकर्कजवळ आता वापरता कशाला ? हा गोअरिंगचा युक्तिवाद खोटा होता. दोस्त सैन्य पळत होते आणि हिटलरने मध्येच गोअरिंगच्या नादाने ही लष्करी घोडचूक केली नसती, तर गुडेरीनच्या सैन्याने २७ किंवा २८ तारखेला डंकर्कवर कबजा केला असता ! मग सर्व दोस्त सैन्यांना शरणागती किंवा मरणागती याशिवाय अन्य पर्यायच नव्हता ! परंतु ' विनाशकाले विपरीत बुद्धी ' या न्यायाने

हिटलरने ही घोडचूक गोअरिंगच्या नादाने केली व गुडेरीनच्या पॅन्झर फौजा डंकर्कपासून ३० मैलांवर पुढच्या आज्ञेची वाट पाहात श्वास रोखून उभ्या राहिल्या.

२८ मे १९४० ला बेल्जमचा राजा तिसरा लिओपोल्ड् याने अपेक्षेप्रमाणे शरणागती दिली. ही शरणागती बेल्जम पत्करणार, याचा अचूक अंदाज लॉर्ड गोर्ट याला तीन दिवसांपूर्वीच आलेला होता आणि म्हणूनच सोमेचा नाद सोडून त्याने डंकर्क ते लिली अशी भक्कम संरक्षण–फळी उभी केली होती.

या बेल्जमच्या राजाचे वर्णन शिरर हा असे करतो—

"The headstrong young ruler, who had taken his country out of its alliances with France and Britain into a foolish neutrality, who had refused to restore the alliances even during the months, when he knew that the Germans were preparing a massive assult across his borders, who, when Hitler had struck, called on French and British for military help and received it, now deserted them in desparate hour."

[ या तापट वृत्तीच्या तरुण नृपाने जिवावर बेतले तेव्हा आपल्या उपकारकर्त्या दोस्तांनाच तोंडघशी पाडले होते. याच महाभागाने फ्रेंच व इंग्लंड यांचेशी असलेले दोस्तीचे करार संपुष्टात आणून, आपल्या देशाच्या गळ्यात मूर्खपणाची तटस्थता अडकवली होती. देशाच्या सरहद्दीवर जर्मन सैन्याची प्रचंड जमवाजमव सुरू आहे याची माहिती असूनही या माणसाने ब्रिटिश व फ्रेंचाशी लष्करी करार करण्याचे नाकारले. प्रत्यक्ष जेव्हा जर्मन सैन्ये देशाच्या सरहद्दीवरून आत घुसली, तेव्हा याने ब्रिटिश व फ्रेंचांकडेच मदतीची याचना केली व ही मदत स्वीकारली. परंतु अखेर जिवावर बेतले, तेव्हा उपकारकर्त्यांच्या भवितव्याचा विचार न करता त्याने शरणागती देऊन त्यांना तोंडघशी पाडले. ]

### राजे लिओपोल्ड यांची शरणागती

राजे लिओपोल्ड यांनी शरणागतीचा निर्णय घेण्यापूर्वी आपल्या सरकारचा तरी पाठिंबा मिळवला होता का ? पंतप्रधान व सर्व मंत्रिमंडळ या निर्णयाच्या विरुद्ध होते. त्यांनी राजाला सल्ला दिला, की त्यांनी हॉलंडच्या विल्हेमिना राणीप्रमाणे व राजे हकून यांच्याप्रमाणे इंग्लंड गाठावे व लढा चालू ठेवावा ! परंतु लिओपोल्ड यांनी या गोष्टीला नकार दिला. त्यांनी स्पष्ट कबुली दिली—

"I have decided to stay. The cause of the allies is lost !"

[ मी इथेच राहणार आहे. दोस्तांनी लढावे, असे आता काही उरलेले नाही. ]

२७ मे १९४० ला सायंकाळी पाच वाजता राजांनी युद्ध बंद करा, अशी याचना केली व ती कसलीही अट लादून न घेता जर्मनांनी स्वीकारली ! २८ मे ला पहाटे ४ वाजता बेल्जमचा प्रतिकार संपला. पंतप्रधान पिरोट (Pierlot) हे

मात्र पॅरिस येथे निसटले.

बेल्जमच्या राजाचे पाठीराखे असे प्रतिपादन करतात, की २६ मेला जर लॉर्ड गोर्ट यांना डंकर्कमधून सैन्य बाहेर काढा, अशी आज्ञा सुटली होती, तर बेल्जम सैन्याने लढत राहणे हा केवळ आत्मनाशच ठरणार होता ! त्यांनी केले तेच बरोबर केले, हा युक्तिवाद सर्वस्वी उलटचा काळजाचा आहे. पहिली गोष्ट अशी, की ब्रिटिश सैन्याला माघारीच्या आज्ञा सुटल्या आहेत, ही गोष्ट २८ मेपर्यंत राजे लिओपोल्ड यांना ठाऊक नव्हती. त्यापूर्वी कळण्याचीही शक्यता नव्हती. समजा, ही गोष्ट त्यांना माहीत होती, तरीही जास्तीतजास्त दोस्त सैन्य जर्मनांच्या कचाट्यातून वाचावे, म्हणून जिवात जीव असेपर्यंत लढत राहणे, हे बेल्जमचे कर्तव्य होते ! बेल्जमच्या मदतीला धावत जाऊन ब्रिटिश व फ्रेंच रक्त बेल्जमच्या भूमीवर गळत असताना, शरणागतीचा स्वार्थी विचार करून लॉर्ड गोर्ट यांच्या पाठीत वार करण्याचे कृत्य हे कुठल्याही पद्धतीने विचार केला तरी निंद्यच ठरते !

### ऑपरेशन डायनॅमो

२४ मेला जनरल गुडेरीन यांच्यावर बजावलेली– " पुढे जाऊ नका ! " ही आज्ञा दि. २६ ला मागे घेण्यात आली. जनरल गुडेरीनच्या टँकस् आता पुढे जाण्याचा प्रयत्न करू लागल्या आणि लॉर्ड गोर्ट यांनी समोर उभ्या केलेल्या तोफखान्यापुढे कच खाऊ लागल्या ! दि. २६ लाच लॉर्ड गोर्ट यांना ब्रिटिश नाविक खात्याकडून (Admirality) आज्ञा आली होती— " Begin operation Dynamo ! " ऑपरेशन डायनॅमो हे ब्रिटिश व फ्रेंच फौजा डंकर्कमधून बाहेर काढण्याच्या योजनेचे परवलीचे नामकरण होते.

ॲडमिरल, रॅम्से याने डंकर्कच्या सागरात ८५० ब्रिटिश जहाजांचा ताफा उभा केलेला होता. डंकर्क बंदरातून दोस्तांची माघार सुरू झाली. एका अंगाला दोस्ताच्या तोफखान्याने जनरल गुडेरीनच्या सैन्याला डंकर्कपासून तीस मैलांवर अडवले होते व ब्रिटिशांची आरमारी-दले झपाट्याने बोटी भरभरून दोस्त सैनिकांना डंकर्कमधून आता बाहेर काढू लागले होते. बेल्जमच्या शरणागतीने निर्माण झालेले भगदाडही लॉर्ड गोर्ट यांनी संरक्षकफळ्या उभारून बुजवले होते.

२७–२८–२९–३० मे या चार दिवसांत किती सैन्य निसटले पाहा.

२७ मे — ७६६९
२८ मे — १७८०४
२९ मे — ४७३१०
३० मे — ५३८२३

म्हणजे जवळजवळ १,२६,६०० एवढे ब्रिटिश सैन्य चार दिवसांत निसटले होते.

### स्वीट फायर आणि लुफ्तवाफ

३० मे १९४० ला सकाळी काय घडत आहे याचा सुगावा जर्मनांना लागला !

सैन्य सुखरूप निसटत असताना गोअरिंगची विमाने काय करीत होती ? वाईट हवेमुळे त्यांना फारसे काही करता येत नव्हते. निसर्ग दोस्तांच्या दिमतीला धावला होता. परंतु याचा अर्थ लुप्तवाफने हल्ले चढवले नाही, असे नाही......त्यांनी विमानांचे ताफे बॉम्ब फेकण्यासाठी पाठवलेच आणि आतापर्यंत आकाशात हैदोस घालणाऱ्या गोअरिंगच्या मेसरमिट् (Messerschmilt) विमानांशी इंग्लंडच्या स्वीटफायर विमानांनी प्रथमच झुंज घेतली. इंग्लिश किनाऱ्यावरून आलेल्या स्वीटफायर विमानांनी ब्रिटिश सैन्यावर बॉम्ब फेकणाऱ्या गोअरिंगच्या विमानांचा बराच नक्षा उतरवला.

स्वीटफायर विमानांची ही आक्रमक हालचाल पाहताच गोअरिंग चवताळला. ब्रिटिशांच्या ८६१ जहाजांतील २४३ जहाजे जर्मन विमानांनी बुडवली होती परंतु जवळजवळ ६०० ससैन्य निसटली आहेत याचे शल्य त्याला झोंबू लागले. १ जून १९४० या दिवशी गोअरिंगच्या लुप्तवाफ्ने अतिभीषण बाँबहल्ला चढवला. तीस विमाने ब्रिटिशांनी व तेवढीच जर्मनीनेही गमावली. आकाशातले हे पहिल मोठे रणकंदन डंकर्कच्या डोक्यावर झाले. या दिवशी जवळजळ सहा ब्रिटिश जहाजे लुप्तववाफने बुडवली असली, तरी १ जून या दिवशीही ६४,४२९ एवढे ब्रिटिश सैनिक जर्मनांच्या कोंडीतून निसटलेच.

२ जूनला मागे राहिलेल्या सैन्याचा हिशेब होता– ४००० ब्रिटिश व १,००,००० फ्रेंच ! !

२ व ३ जून या दोन दिवसांत डंकर्कपर्यंत युद्ध येऊन भिडले. जर्मन सेना सर्व बाजूने पुढे सरकल्या होत्या. तरीहि ६०,००० फ्रेंच सैन्य ब्रिटिश आरमाराने डंकर्कमधून या दोन दिवसांत बाहेर काढले.

३,३८,२२६ एवढे दोस्त सैन्य जर्मनांच्या दाढेतून ब्रिटिश आरमाराने बाहेर काढले खरे, परंतु त्यांची सारी शस्त्रास्त्रे दारूगोळा, रणगाडे हे जर्मनांच्या हाती पडले होते. ब्रिटनचे वायुदल फ्रान्सच्या युद्धात पुरते अर्धमेले झाले होते. फ्रान्सचा किनारा आता जर्मन सैन्यांच्या हाती पडला होता. पाच ते दहा मिनिटांच्या झेपेत जर्मन विमाने आता लंडन या शहरावरही बॉम्बवर्षाव करू शकणार होती !

## रात्रीच्या गर्भात .....

सर्वत्र अंधार होता ! सैन्य वाचले होते, परंतु शस्त्रे नव्हती. आरमार होते, परंतु त्याला विमानांचे छत्र उरले नव्हते. खांद्याशी खांदा भिडवून जो लढेल, असा विश्वास होता, तो दोस्त चारीमुंड्या चीत होण्याच्या मार्गावर होता. हाकेच्या अंतरावर शत्रू आपल्या विजयोन्मादात आता डरकाळू लागला होता.

क्षणाक्षणाला काळोख वाढतच होता ! रात्री लांबत होत्या. जखमा अनंत होत्या. फुंकर घालायलाच कुणी उरले नव्हते. सारे जग स्तिमितावस्थेत ढकलले गेले होते.

अशा या नैराश्यरात्रीतूनहि धीराचा आवाज घुमला ! ! आवाजापाठोपाठ फक्त

शब्द आले ! नुसते शब्दच ! ! परंतु प्रत्येक शब्द हा ठिणग्यांसारखा उडाला होता ! असे शब्द युगायुगात एखादे वेळेसच उच्चारले जातात. अशाच भीषण काळरात्रीत त्यांचा जन्म असतो... परंतु एकदा ते उच्चारले गेले, की मग ते फक्त शब्द म्हणून उरतच नाहीत. त्या शब्दाची नक्षत्रे होऊन इतिहासाच्या पटावर ते अक्षय होऊन राहतात.

४ जून १९४० ! सकाळची वेळ होती. ... डंकर्कमधून येणाऱ्या अतिश्रमाने थकलेल्या विकलांग दोस्त सैनिकांची जहाजे इंग्लिश किनाऱ्यावर एकीकडे लागत होती व याच वेळी विन्टन चर्चिल कॉमन्स सभागृहात मेरुपर्वतासारखे निश्चल उभे राहून सांगत होते–

" We shall go on to the end. we shall fight in France, we shall fight in the seas and oceans, we shall fight with growing confidence and growing strength in the air, we shall defend our Island, whatever the lost may be; we shall fight on the beaches, we shall fight on the landing grounds, we shall fight in the fields and in the streets, we shall fight in the hills; we shall never surrender and even if –which I do not for a moment believe, this Island or a large part of it were subjugated and starving then our empire beyond the seas, would carry on the struggle until in God's good time, the new world with all it's power and might step forth to the rescue and the liberation of the old."

[ आपण अखेरपर्यंत लढणार आहोत. आपण फ्रान्समध्ये लढू, समुद्रावर आणि सागरावर लढू, दिवसेदिवस वाढत्या विश्वासाने आणि शक्तीनिशी आकाशात लढू व आपल्या देशाचे रक्षण करूच करू ! पडेल ती किंमत यासाठी आपण देऊ. समुद्रकाठावर लढू, विमानतळावर लढू, शेतांत– रस्त्यांत लढू– डोंगरात लढू, परंतु काय वाटेल ते झाले, तरी आपण शरणागती पत्करणार नाही. जर दुर्दैवाने – मला व्यक्तिशः असे काही घडेल, असे क्षणभरही वाटत नाही– आपल्या देशावर किंवा देशाच्या पुष्कळशा भागांवर आक्रमण झालेच व उपासमार सुरू झाली, तर समुद्रापलीकडील आपल्या साम्राज्यामधून हा लढा नेटाने सुरूच राहील... ! केव्हातरी परमेश्वराच्या आशीर्वादाने एक नवे पर्व निर्माण होईल व आपल्या नव्या शक्तीने व सामर्थ्याने या जुन्या पर्वाच्या मानेभोवती पडलेला फास दूर होऊन स्वतंत्रतेचे वारे पुनः खेळू लागेलच ! ]

**फ्रान्समध्ये जर्मन सैन्याचा लोंढा**

ब्रिटिशांचा हा लढण्याचा निर्धार हिटलर, हिशेबात धरण्यास आता तयार नव्हता. त्याच्या अंदाजाप्रमाणे फ्रान्सला धुळीला मिळविले, की त्याच्या दोस्तांचे डोळे उघ-

डून त्यांना शहाणपणा सुचेल, अशी त्याची खात्री होती. म्हणूनच फ्रान्सला शक्य तितक्या लवकर नेस्तनाबूद करण्याच्या उद्योगाला हिटलर लागला.

५ जून, १९४० ला डंकर्क पडले व त्याचक्षणी सर्वच्या सर्व जर्मन सैन्य सोमे ते ऱ्हाईन या चारशे मैलांच्या आघाडीवरून रोरावत आता दक्षिण फ्रान्सवर तुटून पडले.

फ्रेंचांची घटका आता तर भरतच आलेली होती. १४३ जर्मन डिव्हिजन एवढ्या जर्मन सैन्यदलासमोर फ्रेंचांचे दुय्यम दर्जाचे ६५ डिव्हिजन सैन्य टिकाव कसा धरणार? फ्रेंचांची सर्व उत्तमोत्तम सैन्यदले बेल्जम–डंकर्कच्या लढाईत एकतर मारली गेली, कैद झाली वा इंग्लंडमध्ये पळून गेली होती. उरला होता तो सर्व दुय्यम दर्जाचा सैन्यविभाग.

सर्वच्या सर्व फ्रेंच विमानदल नष्ट झाले होते. ब्रिटिश किनारा सोडून ब्रिटिश विमाने आता फ्रान्समध्ये जाऊ शकत नव्हती. फ्रान्सच्या सरकारची सर्व सूत्रे आता मार्शल पेताँ व जनरल वेगाँ यांचे हाती सुपूर्त झालेली होती.

भरतीची लाट पसरावी तसे जर्मन सैन्य फ्रान्सभर पसरत चालले होते. (German troops surged across France like a tidal ware. They were moving so fast that they were after getting in each other's way.)

[ इतक्या झपाट्याने त्याचे आक्रमण सुरू होते, की या वेगामुळेच सैन्याचे विभाग एकमेकांच्या आड येत होते. ]

## एफेल टॉवरवर स्वस्तिक

या लोंढ्यापुढे फ्रान्सचे सैन्य पळत होते. १० जून, १९४० ला फ्रेंच सरकारने पॅरिस शहर सोडले व १४ जून, १९४० या दिवशी बंदुकीची एक गोळीही न झाडता जनरल कुएचलेरच्या सैन्याने पॅरिसमध्ये प्रवेश केला. एफेल टॉवरवर स्वस्तिक चिन्हांकित निशाण डौलाने फडकू लागले.

पंतप्रधान रेनो हे आपले सरकार घेऊन बोर्डेक्स येथे गेले होते. तेथे पोचल्यावर, पॅरिस पडल्यानंतर दोन दिवसांनी, म्हणजे १६ जूनला त्यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला व मार्शल पेताँ हे पंतप्रधान झाले. १७ जून, १९४० ला पंतप्रधानपद स्वीकारून २४ तास उलटण्यापूर्वीच मार्शल पेताँ यांनी स्पॅनिश वकिलामार्फत जर्मनीकडे युद्धबंदीची विनवणी पाठवली.

हिटलरने उत्तर पाठवले, "या बाबतीत आम्हांला आमचे मित्र मुसोलिनी यांच्याशी विचारविनिमय करावा लागेल !"

कारण मुसोलिनीने पॅरिस पडण्यापूर्वी चारच दिवस फ्रान्सविरुद्ध युद्ध घोषित केले होते. इटालियन फौजांनी फ्रेंच सरहद्द ओलांडलेली होती. (१० जून १९४०).

ज्या दिवशी हिटलरने बेल्जम–हॉलंडवर हल्ला चढवला त्याच दिवशी, त्याच घाईगर्दीत त्याने मुसोलिनीला पत्र लिहून आपला पुढचा बेत कळवला होता.



१९४० चा फ्रान्स...पराभव...लाचारी...अगतिकता

१३-१८-२५ मे या तारखांना हिटलरने मुसोलिनीला पुन: वारंवार पत्र पाठवून युद्धात पडण्याची तारीख ठरविण्याचा सल्ला दिला होता.

जर्मन सेनादल-प्रमुखांना हिटलरने मुसोलिनीच्या युद्धप्रवेशाला का महत्त्व द्यावे, याचा उलगडाच होत नव्हता. परिस्थिती अशी होती, की मुसोलिनी युद्धात पडला काय, किंवा न पडला काय, फ्रान्सचा पाडाव अटळ होता.

कदाचित हिटलरची अशी अपेक्षा असेल, की फ्रान्स सोमेच्या दक्षिणेस फळी उभी करू शकेल व अशा वेळी फ्रेंचांच्या पाठीत मुसोलिनीने वार केल्यास—फ्रेंचांना त्वरित शरणागतीशिवाय अन्य मार्गच उरणार नाही.

परंतु मॅन्स्टीनचा युद्धव्यूह अपेक्षेबाहेर यशस्वी होऊन बेल्जम शरण गेले व दोस्त

फौजा कोंडल्या गेल्या. डंकर्कहून त्यांनी काढता पाय घेण्यास सुरवात केली, त्याच दिवशी म्हणजे ३० मे, १९४० ला मुसोलिनीने हिटलरला पत्र लिहून कळवले, की ५ जूनला इटालियन फौजा फ्रान्सवर चालून जातील. परंतु हिटलरने त्याला विनंती केली, " आणखी चार-पाच दिवस जाऊ देत ! "

## मुसोलिनीचा फसलेला वार

मुसोलिनीने हिटलरचे म्हणणे मानून अखेर १० जून, १९४० ला अल्पाईन आघाडीवर फ्रेंचांच्या पाठीत वार केला. या आघाडीवर फ्रेंचांचे फक्त सहा डिव्हिजन्स सैन्य होते. परंतु एक आठवडाभर प्रयत्न करूनही इटालियन सैन्याला फ्रेंचांना रेसभर मागे सारण्यातही यश आले नाही.

इटालियन सैन्याची ही दारुण परिस्थिती पाहून मुसोलिनी अत्यंत अस्वस्थ झाला होता. त्याला आशा वाटत होती, की पुढच्या दोन-चार दिवसांत मोठा विजय मिळवून, आपण फ्रेंचांविरुद्ध उघडलेल्या आघाडीचे मूल्य सिद्ध होईल. परंतु १७ जूनला मुसोलिनीला हिटलरचे निमंत्रण मिळाले—

" फ्रेंचांनी तहाची याचना केली आहे. विचारविनिमयासाठी त्वरित या ! "

मुसोलिनीचा अत्यंत विरस झाला ! त्याच्या मन:स्थितीचे वर्णन त्याचा जावई सियानो याने केले आहे. १७ जूनला सायंकाळी हे दोघे हिटलरला भेटण्यासाठी निघाले होते. सियानो लिहितो—

" This sudden peace disquiets him. The Duce would like to go so far as the total occupation of French teritory and demands surrender of French fleet. But he knows that his opinion has only consultive value. The war has been won by Hitlar and it is Hitlar who will have the last word. This naturally disturbs and saddens him. "

[ एकाएकी युद्धबंदी होणार, यामुळे मुसोलिनी दु:खी झाला आहे. तहाच्या वाटाघाटीत–सर्व फ्रेंच मुलूख जर्मनांनी व इटालियनांनी व्यापावा व फ्रेंच आरमाराने शरण यावे, याबद्दल त्याचा आग्रह राहणार होता. परंतु त्याला हे माहीत होते, की तहाच्या वाटाघाटीत त्याचे मत हे केवळ सल्लावजाच राहणार आहे. हे युद्ध हिटलरने जिंकले होते व त्याचाच शब्द अखेरचा राहणार होता. अर्थातच यामुळे मुसोलिनी अस्वस्थ होता–दु:खी होता. ]

ज्यावेळी फ्रान्सचा पराभव अटळ दिसू लागला, तेव्हाच मुसोलिनीने एकदम युद्धाची उचल केली होती. शिकार हिटलरने उरकताच त्याच्या ताटात जेवण्याची घाई मुसोलिनीला होणार, याची अचूक अटकळ चर्चिल यांना होती व त्याला या साहसापासून परावृत्त करण्यासाठी चर्चिल यांनी १६ मे, १९४० ला त्याला आर्जवीपणाने पत्र लिहिले होते—

## चर्चिल आणि मुसोलिनी

" मी पंतप्रधानपद व संरक्षणमंत्री म्हणून आता अधिकारावर आल्यावर, मला आपल्या मागील रोम येथील भेटीचे स्मरण होत आहे व त्यामुळे आमच्या सदिच्छा व्यक्त कराव्या, या हेतूने मी हे पत्र लिहीत आहे. आपल्या देशात जी संघर्षाची दरी उत्पन्न होऊ पाहात आहे, त्यापासून इटालीचा सर्वाधिकारी म्हणून आपणच काही करू शकाल. ब्रिटिश व इटालियन रक्त भूमध्य समुद्रात सांडलेच पाहिजे का ? जर तुम्ही ठरवलेच असेल तर अटळ आहे. परंतु माझ्यापुरते बोलायचे, तर मी तुमच्या देशाच्या मोठेपणाचा द्वेष्टा नाही व तुमचा शत्रूही नाही. आता युरोपात जे युद्ध पेटले आहे, ते कोणते वळण घेईल, हे सांगता येणार नाही. परंतु माझी खात्री आहे, की युरोपात काहीही घडले, तरी इंग्लंड अखेरपर्यंत लढत राहील. मी कसल्याही दुबळेपणाच्या भूमिकेतून आपल्याला ही विनंती करीत नसून, आपल्या इतिहासाच्या आधारे असे म्हणतो, की लॅटीन व ख्रिश्चन या संस्कृतीच्या वारसदारांनी एकमेकांचा घोट घेण्यास उद्युक्त होण्याची मुळीच आवश्यकता नाही......"

चर्चिल यांच्या या पत्राला मुसोलिनीने जे उत्तर पाठवले, ते अगदी उघडे-नागडे होते. मुसोलिनीने कळवले--

" तुमच्या आलेल्या निरोपाला उत्तर म्हणून मी असे कळवू इच्छितो, की आज आपले दोन्ही देश हे विरुद्ध गटात का उभे आहेत, याची गंभीर ऐतिहासिक कारणे आपल्याला ज्ञात आहेत. फार लांब कशाला, १९३५ साली इटालीविरुद्ध जिनिव्हा करारानुसार इतर देशांनी बहिष्कार पुकारावा, यासाठी आपल्याच देशाने पुढाकार घेतला होता. आम्ही आमच्यासाठी आफ्रिकेत थोडी भूमी निर्माण करू इच्छित होतो......(ॲबिसिनियावरील चढाई) यात तुमच्या हिताला कसला बाध पोचत होता ? किंवा इतर कुणाच्या प्रदेशाला कसला धक्का पोचत होता ? आम्ही आमच्याच समुद्रात दुसऱ्याचे गुलाम होऊन पडलो आहोत. तुम्ही केलेल्या कराराचा शब्द पाळण्यासाठी, तुम्ही जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारलेत आणि याच प्रकारच्या शब्दपालनासाठी–इटाली–जर्मनी यांच्या कराराप्रमाणे आमचे परराष्ट्रीय राजकारण आज सुरू आहे व उद्या राहील. मग परिणाम काहीही होवोत."

## रुझव्हेल्टची सूचक प्रतिक्रिया

मुसोलिनीच्या या पत्रानंतर इटालीचा युद्धप्रवेश हे चर्चिल यांना मुळीच आश्चर्य राहिलेले नव्हते. म्हणूनच १० जून रोजी, रोम येथील आपल्या निवासाबाहेरील सज्जातून मुसोलिनीने जेव्हा फ्रान्स व ब्रिटनविरुद्ध युद्ध घोषित केल्याचे जाहीर केले, तेव्हा चर्चिल यांनी त्वरित निर्णय केला–

" काही झाले तरी फ्रेंच आरमार जर्मनीच्या हाती पडता कामा नये." कारण फ्रेंच आरमार जर्मनी-इटालीच्या हाती पडले, तर भूमध्यसमुद्रात ब्रिटिशांची लांडगेतोड अटळ ठरली असती.

१० जून, १९४० ला मध्यरात्री राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात अमेरिकेचे अध्यक्ष रुझवेल्ट यांनी उद्गार काढले–

"On this 10th day of June 1940, the hand that held the dagger has struck it into the back of his neighbour."

[आज जून, १९४० च्या या दहाव्या दिवशी, जो हात खंजीर घेऊन टपलेला होता, त्याने आपल्या दोस्ताच्या पाठीत वार केला आहे.] रुझवेल्ट यांचे हे शब्द रेडिओवरून चर्चिल यांनी ऐकताच त्यांनी समाधानाचा सुस्कारा सोडला. अमेरिकेच्या अध्यक्षांच्या या प्रतिक्रियेत चर्चिल यांना अमेरिका युद्धात पडण्याचे स्वप्न दिसू लागले होते.

सियानोसहवर्तमान मुसोलिनी म्यूनिक येथे पोचला. फ्रान्सवर शस्त्रसंधी (Armistic) साठी काय अटी लादाव्या, याचा विचार फ्यूररहाउस या हिटलरच्या निवासात सुरू झाला.

'काही झाले तरी फ्रेंच आरमार ब्रिटिशांच्या हातात पडता कामा नये व फ्रेंच सरकार हे फ्रेंचभूमीवरच अस्तित्वात राहिले पाहिजे, या दोन सूत्रांवर वाटाघाटीत विचार व्हावा'– असे हिटलरने बजावताच मुसोलिनीचे दुःख शतगुणित झाले. टुलोन या बंदरात सर्वच्या सर्व फ्रेंच आरमार एकत्रित झालेले होते व टुलोनचा कबजा करावा, ही मुसोलिनीची सूचना हिटलरने फेटाळून लावली. मार्सेलिस बंदर, कॉर्सिका, ट्युनिशिया हे भूभाग, हे सर्व पराभूत फ्रेंच सरकारच्याच अमलाखाली राहतील, असे हिटलरने धूर्तपणे ठरवले.

युद्धभूमीवरचे प्रचंड विजय व त्यानंतरचे आपले रोममधील स्वागत हे मुसोलिनीचे स्वप्न ठिकऱ्या होऊन पडले. आता काय बहुधा इंग्लंड शरणागतीच पत्करील व शांतता झाली, तर हजारो वर्षांत येणाऱ्या अशा सुवर्णसंधीचा फायदा आपल्याला काहीच मिळणार नाही; या विचाराने मुसोलिनी उद्विग्न झाला. त्याने सूचना केली–

"निदान फ्रेंचांशी शस्त्रसंधी करावयाचा तो जर्मनी व इटाली या दोन देशांनी मिळून एकत्र करावा."

–हिटलरने मुसोलिनीला दुसरी चपराक दिली! हे शक्य नाही. फ्रेंचांशी जर्मनी वेगळा तह करील व इटालीने वेगळा तह करावा! हिटलरला आपल्या या गौरवाच्या अत्युच्च क्षणात मुसोलिनीची भागीदारी नको होती.

**विजयाच्या अत्युच्च क्षणी....**

सियानो हा हिटलरचा द्वेष्टा होता, परंतु या वाटाघाटीत हिटलरची जी नवी बाजू त्याने जवळून पाहिली, त्यामुळे तो स्तिमित झाला. फ्रेंचांना अधिकच पेचात टाकण्याचे हिटलरने नाकारले. ज्या रेषेवर शस्त्रसंधी होईल, त्या रेषेपलीकडे जर्मन सैन्य येणार नाही, असे त्याने ठरवले व फ्रेंच आरमाराचा कबजाही पराभूत

फ्रेंचांकडेच ठेवला. सियानो दैनंदिनीत लिहितो–

"Hitler is now the gambler, who has made a big scoop & would like to get up from the table, risking nothing more. To-day he speaks with a reserve & a perspicacity which after such a victory is really astonishing. Today I truly admire him."

[ हिटलरने जुगार चालवला आहे. प्रचंड यश त्याने अल्पावधीत पदरात पाडले आहे व कसलाही धोका न पत्करता आता तो तक्टावरून उठू पाहात आहे. आज तो फारसे बोलला नाही, परंतु जे बोलला ते दूरदर्शीपणाने व सावधपणाने ! एवढ्या मोठ्या विजयानंतर एवढी सावधता राहाणे खरोखरच आश्चर्यकारक म्हटले पाहिजे. आज मला हिटलरचे कौतुक वाटले– ]

शिरर हा स्वत: जर्मन सैन्यापाठोपाठ पॅरिस येथे दाखल झाला. १९ जूनला हिटलर आपल्या शस्त्रसंधीच्या मागण्या मार्शल पेतॉं यांच्यापुढे कोणत्या ठिकाणी ठेवणार आहे, याचा पत्ता त्याने लावला. शिरर सांगतो–

"११ नोव्हेंबर १९१८ रोजी ज्या स्थळी जर्मन साम्राज्याने फ्रान्स व दोस्त राष्ट्रांपुढे लोटांगण घातले, तीच जागा निवडण्यात आली होती. कोम्पेन (Compiegne) जवळच्या रानात हे स्थळ होते. त्याच स्थानावर नाझींचा युद्धजेता नेता आपला सूड उगवणार होता... त्याच जागी हा समारंभ घडवला गेल्यास त्याला अधिकच चव येणार होती. ज्या दिवशी जर्मनीची टँकदले ॲबरव्हीलला पोचली, त्याच दिवशी म्हणजे २० मे १९४० ला हिटलरच्या मनात या संबंधीचा विचार सुरू झाला होता, असे जोडल् याने आपल्या दैनंदिनीत नमूद केले आहे. ही नोंद अशी आहे– 'फ्यूरर शस्त्रसंधीचा विचार करू लागला आहे. पहिली बोलणी कोम्पेनच्या रानातच होणार...'

## कोम्पेनच्या रानातील सूडाचे नाटय

"१९ जूनला मी दुपारी कोम्पेन येथे पोचलो. मार्शल फॉश यांच्या ज्या गाडीच्या डब्यात, १९१८ साली जर्मनीची शरणागती झाली तो डबा तेथे जतन करून ठेवलेला होता. त्याच्या भोवताली बांधलेल्या भिंती जर्मन इंजिनीअर्स, मी तेथे गेलो तेव्हा पाडीत होते. न्यूमॅटिक ड्रिल्सनी त्यांनी भिंती पाडल्या व गाडीचा डबा ते बाहेर ओढून मोकळ्या जागी आणण्याच्या उद्योगात होते. ११ नोव्हेंबर, १९१८ या दिवशी सायंकाळी पाच वाजता तो डबा नेमका ज्या ठिकाणी होता, त्याच ठिकाणी तो नेऊन ठेवण्यात आला–"

याच ठिकाणी शरणागतीचा समारंभ २१ जून रोजी होणार, याची बातमी शिरर याला मिळाली. दोन दिवसांनी म्हणजे २१ जूनला दुपारी शिरर त्या ठिकाणी हजर झाला व रानातल्या कडेजवळ उभा राहून, पुढे काय घडते ते पाहू लागला. शिररने तेथे घडलेल्या घटनांचे निवेदन केले आहे. तो सांगतो–

" फ्रान्समधील उन्हाळ्यातील सुंदर हवा त्या दिवशी पडली होती. जून महिन्यातील सूर्याची काहीशी उष्ण किरणे तेथील राजेशाही वृक्षांच्या माथ्यावर पडली होती. एटम्, ओक, सायप्रसेस व पाईन वृक्षांच्या मजेदार छाया, त्या रानात मध्यभागी असलेल्या काहीशा मोकळ्या वर्तुळाकार भागाकडे जाणाऱ्या पायवाटांवर पसरल्या होत्या. दुपारचे ३। झाले. हिटलर आपल्या मल्यामोठ्या मर्सिडीझ् गाडीतून येऊन पोचला. त्याच्या बरोबर गोअरिंग, ब्राऊश, कायटेल्, रीडर, रिबेन्ट्रॉप व हेस हे आपआपल्या गणवेषात आलेले होते. राईशचा एकमेव फील्ड-मार्शल—गोअरिंग हातातल्या मार्शल बटन्शी खेळत होता. दोनशे यार्डांवर हे सर्व आपआपल्या ऑटोवाहनांतून उतरले. तेथे असलेल्या पुतळ्यावर जर्मन युद्धध्वज गुंडाळलेले होते. हा पुतळा होता आल्सेस लोरेनचा. हातातील तलवार समोर विद्ध झालेल्या जर्मन गरुडाच्या छातीत शिरलेली त्या पुतळ्यात दाखवलेली होती. तो गरुडपक्षी म्हणज १९१८ साली घायाळ झालेले होएन झोलर्न साम्राज्य होय. हिटलरने त्या वस्त्रांकित पुतळ्याकडे दृष्टिक्षेप फेकला व तो पुढे झाला."

" मला हिटलरचा चेहरा दिसत होता. चेहऱ्यावर उग्रता व गांभीर्य होते...मात्र त्या गांभीर्यात सूडाचे समाधान चमचमत होते. त्याच्या चालीत विजयाचा, जेतेपणाचा ढंग होता...जगाला आव्हान देण्याचा जोश होता. याशिवाय आणखीही काही होते...नशिबाचे हे उलटलेले फासे पाहण्यासाठी आपण हजर आहोत व हे दान आपल्यालाच पडले आहे, या गोष्टीचा एकप्रकारचा तो आतला आसुरी आनंद होता!"

" त्या जंगलातील मधल्या मोकळ्या जागी तो पोचण्यापूर्वी त्याचा व्यक्तिगत ध्वज तेथे उभारला गेला होता. तेथे तो पोचताच त्याचे लक्ष जमिनीबाहेर सुमारे तीन फूट उंच अशा रोवलेल्या ग्रॅनाईट दगडाच्या स्मारकावरील आलेखाकडे गेले."

" हिटलर व पाठोपाठ त्याचे अनुयायी हळूहळू त्या दगडापाशी गेले. फ्रेंच भाषेत त्यावर मोठ्या अक्षरांत कोरलेली वाक्ये त्याने वाचली—

" Here on the Eleventh of Nov. 1918, succumbed the criminal pride of the German Empire, vanguished by the free Peoples which it tried to enslave–"

[ या ठिकाणी, ११ नोव्हेंबर १९१८ रोजी जर्मन साम्राज्याचा आसुरी अभिमान गाडला गेला, ज्या स्वतंत्र लोकांना त्यांनी गुलामगिरीत अडकवण्याचा यत्न केला, त्याच लोकांनी हा नक्षा कायमचा उतरवला. ]

" हिटलरने आलेख वाचला. गोअरिंगने वाचला. सर्वांनी उभ्या उभ्या तो वाचला. नि:स्तब्ध शांतता होती. जूनचे ऊन रणरणत होते. पन्नास यार्डांवरून, दुर्बिणीतून हे सर्व पाहात असल्याने मला सर्व गोष्टी अगदी जवळून पाहाव्या तशा दिसत होत्या. जणू हिटलर माझ्या अगदी समोरासमोरच उभा होता. मी आतापर्यंत अनेकवेळा



**१९१८ चा तोच गाडीचा डबा !!**

★

हा चेहरा त्याच्या आयुष्यातील महान क्षणी पाहिलेला होता. परंतु आज ! आज हा चेहरा उपहास, राग, द्वेष, सूड आणि विजय, सर्वांमुळे उजळलेला होता—"

"तो स्मारकावरून खाली उतरला व ही उतरण्याची क्रियाही त्याने अशी केली, की तिरस्कार त्यातून व्यक्त होत होता. त्याने इकडे तिकडे पाहिले व मग हळूहळू आपली नजर मधल्या उघडचा भागावरून फिरवली. अचानक—जणू काय चेहऱ्यावर पुरेशा भावना व्यक्त होत नाहीत, या समजुतीने त्याने शरीराचा पवित्रा भावनेनुरूप बदलला. त्याने दोन्ही हात झटकन एकमेकांत अडकवून पाय रुंद ठेवून, तो खांद्यांना मागे हेलकावा देऊन उभा राहिला. त्याच्या या पवित्र्यात आव्हान होते व बावीस वर्षांपूर्वी जर्मन साम्राज्याचा नाश झाल्यापासून तो त्याची वाट पाहात होता, त्या क्षणाच्या पूर्ततेचा अभिमान होता."

## तोच डबा, तीच खुर्ची

हिटलर आपल्या सहकाऱ्यांसह मग त्या शस्त्रसंधी करारासाठी तयार केलेल्या रेल्वेडब्यात चढला: १९१८ साली ज्या खुर्चीवर फॉश (Foch) बसला होता, त्याच खुर्चीवर हिटलर आता बसला. पाच मिनिटांनी फ्रेंचांचे शिष्टमंडळ आले. जनरल चार्लस हंटगिअर (Huntziger) हा सेडान् येथे पराभूत झालेला फ्रेंच सेनानी नेतृत्व करीत होता. एक फ्रेंच अॅडमिरल व नोएल हा पूर्वीचा पोलंडमधील फ्रेंच वकील या शिष्टमंडळात होते. त्यांच्या चेहऱ्यावर दारुण भाव होते. परंतु त्या शोकांतिकेतही त्यांनी आपले चेहरे शक्य तेवढे सन्माननीय राखण्याचा प्रयत्न चालवलेला होता. त्यांना याची कल्पना नव्हती, की जर्मन साम्राज्य धुळीला मिळवल्याची जी निशाणी समजली जात होती, त्या स्मारकाच्या साक्षीने फ्रेंचांचे जर्मनीपुढील लोटांगण साजरे होणार होते ! त्यांना यामुळे जो धक्का बसला होता, तो हिटलर अपेक्षितच होता.

जनरल कायटेल याने नंतर शस्त्रसंधी कराराची तत्त्वे विशद करणारा भाग

वाचून दाखवला. यात दोन गोष्टी स्पष्ट केलेल्या होत्या. (१) शस्त्रसंधि ज्या रेषेवर होत आहे, त्या रेषेपलीकडे फ्रेंचांचेच अधिराज्य राहील व (२) फ्रेंच आरमार पराभूत फ्रेंचांच्याच कबजात राहील; परंतु त्याचे निःशस्त्रीकरण केले जाईल. जर्मनीला या आरमाराची जरूर नाही. हिटलरने ही दोन्ही तत्त्वे मोठ्या कल्पकतेने स्वीकारली होती. फ्रेंच भूमीवर फ्रेंच सरकार पराभूत अवस्थेत बराच काल राहणे अवश्य होते व फ्रेंच आरमार, त्याची स्वतंत्रता कायम ठेवली तर पेताँ सरकारच्या आज्ञेनुसार फ्रेंच बंदरातच राहण्याची शक्यता होती.

कायटेलने वाचन संपवताच, हिटलर त्या रेल्वेडब्यातून खाली उतरला व निघून गेला. पुढच्या वाटाघाटी त्याने आपल्या युद्धमंडळाच्या सदस्यांवर सोपवल्या होत्या.

जोडल याने आता जर्मनीच्या वतीने बोलण्यास सुरवात केली. जर्मनीच्या अटीत एक अट अशी होती, की नाझीविरोधी असे जे जर्मन लोक फ्रान्समध्ये आसरा घेऊन आहेत, त्या सर्वांना पकडून फ्रेंचांनी जर्मनीच्या हवाली करावे. दुसरी अट अशी होती, की जे जे फ्रेंच सैनिक या शस्त्रसंधीनंतर जर्मनीविरुद्ध लढताना फ्रेंच भूमीबाहेर यापुढे पकडले जातील, त्या सर्वांची फ्रान्सचे देशद्रोही या नात्याने जर्मनी विल्हेवाट लावील. म्हणजे त्यांना गोळ्या घालण्यात येतील. या अटीचा रोख मुख्यतः जनरल डी गॉल यांचेवर होता. कारण ब्रिटनमध्ये निसटलेला हा फ्रेंच सेनानी, तेथे फ्रेंचांचे स्वतंत्र दल जर्मनीविरुद्ध उभे करण्यात गुंतलेला होता. तिसरी अट अशी होती, की जे फ्रेंच सैनिक युद्धात कैद झाले आहेत, ते युद्ध संपेपर्यंत जर्मनीच्याच कैदेत राहातील. जवळजवळ १५ लाख फ्रेंच युद्धकैद्यांचे हे भीषण भवितव्य स्वीकारताना फ्रेंच शिष्टमंडळ तक्रार करू लागले. त्यांनी सांगितले, की आम्हांला मार्शल पेताँ यांच्याशी बोलणी करून काय ते उत्तर द्यावे लागेल.

यावर जोडल याने फटकारले– "पुरेसे अधिकार नसताना मग तुम्ही इथे आलात कशाला ? "

## १५ लाख फ्रेंच सैन्य कैदेत

परंतु असा काही फांदा पडेल याची अटकळ ठेवून हिटलरने त्या ठिकाणी तावडतोब त्या स्थळापासून फोन–लाईन टाकण्याची आज्ञा सोडलेली होती. ही लाईन जोडण्यात आली व फ्रेंच भूमीवर चाललेल्या युद्धाच्या गदारोळातून फ्रेंच शिष्टमंडळाला ताबडतोब मार्शल पेताँ यांचेशी बोर्डेक्स येथे बातचीत करण्यास सांगण्यात आले. फ्रेंचांना हा दुसरा धक्का होता !

बोर्डेक्स येथून जनरल वेंगाँ व मार्शल पेताँ यांनी फोनवरून सर्व अटी स्वीकारल्या. जनरल वेंगाँ यांचा अंदाज असा होता, की इंग्लंड दोन–तीन आठवड्यांत यानंतर शरणागती देईल व युद्ध संपून सर्व फ्रेंच युद्धकैदी परत येतील; या समजुतीखातर त्याने १५ लाख फ्रेंच सैनिकांना जर्मनीच्या कैदखान्यात ढकलले.

पहिल्या दिवशीच्या म्हणजे २१ जूनच्या वाटाघाटी स्थगित झाल्या. दुसऱ्या दिवशी

पुन: वाटाघाटी चालू झाल्या. शस्त्रसंधीवर सही करण्यापूर्वी फ्रेंच शिष्टमंडळ कायदेशीर अडचणी उपस्थित करून हुज्जत घालू लागले. तेव्हा कायटेल याने २२ जूनला सायंकाळी ६–३० वाजता फ्रेंचांना इशारा दिला, की सायंकाळी ७–३० पूर्वी जर जर्मन अटी त्यांनी जशाच्या तशा स्वीकारल्या नाहीत, तर वाटाघाटी मोडल्या, असे समजून आम्ही निघून जाऊ !! ही मात्रा लागू पडली......व २२ जून, १९४० ला सायंकाळी ७–५० ला फ्रेंचांच्यावतीने हंटगिअर याने शरणागतीवर व शस्त्रसंधीवर सही केली.

हा फक्त शस्त्रसंधी होता व तह नंतर होणार होता. पराभूत फ्रेंच राष्ट्रनेते पेतॉं, वेगॉं व लाव्हल यांनी ज्या अपेक्षेने हा शस्त्रसंधी स्वीकारला, त्या अपेक्षा हळूहळू धुळीला मिळाल्या. (१) जर्मनीने आपली सर्व आश्वासने पाळली नाहीत व (२) इंग्लंड शरण गेले नाही......

**Where to ? to Berlin !**

शरणागती उरकताच फ्रेंच शिष्टमंडळ निघून गेले. याचवेळी पावसाचे तुषार पडू लागले. शिरर शस्त्रसंधी ठिकाणाहून कोम्पेन येथे आला. तेथून जाणाऱ्या रस्त्यावरून– फ्रेंच निर्वासितांच्या रांगा आपली घरे धुंडाळीत निघाल्या होत्या. काही सायकलीवर, बैलगाडीत, तर काही जुन्यापुराण्या ट्रकमधून. अनेकजण पायी चालत होते.

काही जर्मन इंजिनीअरांनी तो रेल्वेगाडीचा डबा ढकलीत नेण्यास सुरवात केली. ते सर्वजण मोठमोठ्याने गाणी म्हणत होते. शिररने त्यांना जवळ जाऊन विचारले–

"Where to ?" (कुठे घेऊन चाललात ?) त्यांनी उत्तर दिले "To Berlin." (बर्लिनला)

जे जर्मन साम्राज्याच्या अधोगतीचे स्मारक होते, तेच आता जर्मनीपुढे फ्रेंचांनी दिलेल्या लोटांगणाचे स्मारक म्हणून बर्लिनला राहाणार होते. अशा गोष्टी सूडबुद्धीने करू नयेत, असे काही बावळटांना वाटते. परंतु राष्ट्र जिवंत ठेवावयाचे असेल, तर अशा गोष्टी कटाक्षपूर्वक केल्याच पाहिजेत. देवळाची नशिबाने मशीद झाली, तर संधी येताच मशिदीचे मंदिर झालेच पाहिजे ! असे करणे म्हणजे काहीतरी पाप होय, असे ज्यांना वाटते, ते केवळ करंटे होत ! पुढे जर्मनीचा पराभव झाला. बर्लिनमध्ये नेलेले हे जर्मन विजयाचे स्मारक मात्र पुन: दोस्तांच्या हाती पडले नाही. बर्लिनच्या बॉम्बहल्ल्यात हा रेल्वेडबा नष्ट झाला.

२४ जून १९४० ला सायंकाळी ७–३५ ला फ्रेंचांनी इटालीबरोबर शस्त्रसंधी केला. फ्रान्समध्ये व ट्युनिशियात इटाली व फ्रेंच सरहद्दीवर फ्रेंचांनी ५० मैलांचा टापू निर्लष्करी करावा, ही अट फ्रेंचांनी मान्य केली.

यानंतर सहा तासांनी फ्रान्स देशातील तोफा बंद पडल्या व फ्रान्समध्ये स्मशानशांतता नांदू लागली ! [ अपूर्ण ]

# ××× फुल्या फुल्यांचे पुस्तक

आफत्मे उलझनमे जंजालमे बेहोष हैं
पूरा वह मर्द है कि जो हर हालतमे खूष है ।।

" मी असा भांडतो " हे प्रसिद्ध पुणेरी उपमहापौर श्री. प्र. बा. जोग यांचे पुस्तक 'असाच मर्दाचा पवाडा' आहे, असा निर्वाळा नासिकस्थ कवी श्री. सोपानदेव चौधरी यांनी दिला आहे. भांडणे अंगावर घेणारा माणूस काही प्रमाणात तरी मर्द असावाच लागतो. (अपवाद आपले पंतप्रधान शास्त्री व संरक्षण-मंत्री चव्हाण. कारण हे दोघे 'मर्द' असूनही भारताच्या शत्रूंशी असलेली भांडणे थोडया गोडीने व बऱ्याच नेहरू-गुलाबीने मिटवू पाहातात.) केवळ पृष्ठसंख्येच्या मर्यादेमुळे श्री. प्र. बा. जोग यांनी आपली सर्व १३०५ भांडणे सविस्तर दिली नाहीत. नाहीतर पृष्ठसंख्येतही हा एक अजोड ग्रंथ झाला असता.

## सॉलिड शिव्यांचा स्टॉक

हा ग्रंथ आहे त्या कृश स्वरूपातही अत्यंत वाचनीय आहे. हा ग्रंथ वाचून पुण्या-संबंधी असलेले इतरांचे वाईट मत पुण्याला इरसाल शिव्यांची लाखोली देण्यापर्यंत घसरेल. वस्तुत: अशांची सोय करण्याकरता मराठीतील सर्व शिव्यांचे एकाक्षरी ते चौदा-पंधरा अक्षरी परिशिष्ट या ग्रंथाला लेखकाने जोडायला हवे होते. कारण श्री. जोग सांगतात,

" मी ज्या शिव्या देतो, त्या Solid असतात. माझ्याजवळ साध्या–वावळट, गाढव अशा शिव्यांचा भरणा नाही. तर भडव्या ×××च्या, ××× वगैरे वगैरे अस्सल शिव्यांचा मजजवळ संग्रह आहे."

" माझे वडील यथेच्छ शिव्या देत. माझे तिन्ही काका वडिलांच्या सवाई शिव्या देत. म्हातारपणी मुलांनी मला शिव्या दिल्या, की हे वर्तुळ पूर्ण होईल."

अधूनमधून श्री. जोग यांची जी व्याख्याने पुण्याला होतात, त्या शिव्यांच्या 'क्लासला' चिक्कार गर्दी असते. परंतु पुण्याबाहेरील मंडळींची सोय अशा परि-शिष्टाने झाली असती.

हा ग्रंथ वाचून पैसे खाणारे न्यायमूर्ती, दारूडे वकील, रस्त्यात घाण करणारे शेजारी, पैशाने गरीब परंतु लबाड असे नातेवाईक, तरुण मुलींचे धूर्त नातेवाईक, महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनसारख्या संस्थांतील झब्बूगिरी, अशा विविध गोष्टींचे ज्ञान होईल. वस्तुतः संघर्षाचे असे सर्व अनुभव प्रत्येकालाच येत असतात. रस्त्यात, गाडीत, थिएटरात, बसमध्ये जो तो आपल्या कुवतीप्रमाणे भांडत असतो. परंतु ही



*

भांडणे ' कचरा ' म्हणून विसरली जातात. सध्या ' कलेची माती ' व ' कचऱ्यातून कला ' निर्माण करणे महत्त्वाचे ठरले आहे. अशा या कचरास्वरूप भांडणांची वर्षानुवर्षे नोंद ठेवून, त्याला काही विशाल भांडणांची जोड देऊन श्री. जोग यांनी अत्यंत प्रांजळपणे हे पुस्तक लिहिले आहे. पुस्तक लिहिताना अधूनमधून श्री. जोग हे वाचकांच्या तोंडावरील हसूही कायम ठेवतात. एक प्रसंग ते सांगतात,

" माझा गवळी इलेक्ट्रिकच्या बेलवर जे बोट ठेवीत असे, ते मी दार उघडेपर्यंत. त्या गवळ्याशी मी भांडलो, म्हणालो, हजामा, तुला थोडा वेळच घंटी वाजवून थांबता येत नाही का ? "

## पुणेरी आवाजाचे नमुने

नंतर कळले की तो बहिरा होता. याचप्रमाणे अपरात्री काठी ठोकून चोराला सावध करणारा गुरखा, खॉक खॉक करीत तोंडात बोटे घालून सकाळच्या प्रहरी ऑ ऑ करणारे शेजारी, असे अनेक मासले लेखकाने टिपले आहेत. श्री. जोग यांनी सकाळपासून सुरू होणारे सर्व पुणेरी आवाज टिपले आहेत ते पाहा—

" गवळी गेले की, त्यामागून वर्तमानपत्रवाले आलेच × × × × ! त्यात निकाल असावा कुठल्यातरी परीक्षेचा. मॅट्रिक, व्ह. फा., बी. ए. म्हणजे ओरडण्याबद्दल बघायलाच नको. "

" वर्तमानपत्रवाले येऊन गेले की फेरीवाल्यांची × × सुरू होते. ती मग रात्री सात वाजेतो. ' मटकी मोडाची ए, ' 'भाजी ए–कांदे बटाटे, ' ' कल्हई ए, ' ' रद्दी पेपाऽऽर, ' ' रफू करायचे ऽऽऽ '

" एकदा पाहातो तर एकजण ओरडत होता, ' खलास झाला ऽऽऽ खलास झाला. ' पाहातो तर गजरा मोगऱ्याचा. शनिवारी, रविवारी दुपारच्या वेळी डालडाचे, रॉकेलचे डब्यांना झाकणे बसवण्याचा व आपल्या संपत्तीत भर टाकण्याचा मोह अनेक गृहिणींना होतो. मग तो डबेवाला रिकामे डबे ठोकण्याचा जो आवाज करतो, तो तासभर चालू असतो— "

"नंतर आइसफ्रूटवाले आइस फ्रू ऽऽट ! केळीवाले, आंबेवाले, नंतर संध्याकाळी खेळणीवाले, हर माल दो आनेवाले! नंतर दोन फुगे दाबून फुगेवाला जो आवाज काढतो त्याची सर तर कोठल्याच खेळण्याला येणार नाही. लहान मुलांना खेळणी प्रिय असतातच आणि लहान मुलांना हिंदुस्थानात तोटा नाही. एका मुलाने खेळणे घेतले रे घेतले की पन्नास मुलांच्या हातात तेच खेळणे दिसते. मग विचारायलाच नको. 'टम् टम् टण् टण्––'

"पावसाळ्याच्या दिवसात छत्री दुरुस्त करणारे, बोहारणी, कल्हईवाले. चंद्र-ग्रहणाच्या दिवशी कहरच झाला. 'दे दान सुटे गिराण,' म्हणून जे लोक ×× मारू लागले. रात्री दोन वाजल्यापासून ते सकाळी ६ वाजेपर्यंत ग्रहण कोणालाच दिसत नव्हते."

"रात्री आठ ते साडेदहा भिकारी, 'अन्न वाढा हो माय,' म्हणून जो टाहो फोड-तात त्याला तोड नाही."

"याच्या जोडीला रेडिओवरील श्रुतिका, नाटके असतातच. रेडिओ संपला की सिनेमा, नाटकांहून परतणारी मंडळी. त्यांची पाळी संपली की गुरखा. हा गुरखा तासातासाने लोकांची झोपमोड करण्यासाठी ठेवलेला असतो. लोकांनी हा गुरखा पैसे देऊन ठेवलेला असतो, हा यातला खरा विनोद आहे."

## शोधाविषयी शंका

याशिवाय अनुभवाच्या आधारे लेखकाने काही नवी संशोधनेही नोंदवली आहेत. त्यातील एक असे आहे–

"कोकणस्थ हे मुळात वस्ताद. परंतु एकारांत कोकणस्थ हे महावस्ताद. भिडे, गोगटे, भावे, लिमये, फडके, वझे, परांजपे ही मंडळी जोग, चिपळूणकर, देवधर या मंडळींपेक्षा खूपच वस्ताद."

अर्थात लेखक स्वतः अकारांत आहे, तरीही ते उपमहापौर कसे झाले याची सुरस हकीकत वाचून वरील शोधाविषयी शंका निर्माण होते.

या ग्रंथाचे विस्तृत परीक्षण दिले तर श्री. जोग यांचे आमच्याशी १३०६ वे भांडण होईल. ते म्हणतील, "हजामांनो, पुस्तकातली सगळी गंमत परीक्षणात दिलीत. त्यामुळे हे पुस्तक खपले नाही. पाच हजार रुपये नुकसानभरपाईची ही नोटीस." म्हणूनच केवळ थांबतो.

**मधुकर वकील**

● ● ●

['मी हा असा भांडतो. मी हा असा बोलतो. मी हा असा आहे.' लेखक व प्रकाशक प्र. बा. जोग, १५६९ सदाशिव, पुणे २.]

# रंगभूमीवरील नवे आपटबार

## हे पहाण्यापेक्षा निवांत झोप बरी

मराठी रंगभूमीवर प्रत्येक आठवड्याला किमानपक्षी एक तरी नवे मराठी नाटक सादर होत आहे. त्यामधून नवीन नवीन कलाकार, तंत्रज्ञ प्रकाशात येत आहेत. नवे नवे नाटककारही माहीत होत आहेत. पु. ल. देशपांड्यांसारख्या मान्यवरांनी-देखील आजच्या मराठी रंगभूमीला सुगीचे दिवस आले असल्याचे ठामपणे प्रतिपादन केले आहे. पण खरोखरच हे असे दिवस आले आहेत की भरले आहेत? मराठी रंगभूमी दिवसेंदिवस अधोगतीच्या मार्गाने जात आहे असे दिसून येईल.

गेल्या सहा महिन्यांत सादर झालेल्या नव्या नाटकांचा विचार करा. एक देखील नाटक प्रेक्षकांच्या पसंतीस उतरलेले नाही. यामधील प्रत्येक नाटक इतक्या काही हास्यास्पद दोषांनी बुजबुजलेले आहे, की ते लिहिल्याबद्दल नाटककाराला दोषी धरावे, की सादर करणाऱ्या संस्थेला, एवढाच मतभेद होऊं शकेल! एकाही नाटकात मनाला पटेल असे सुसूत्र कथानक नाही, ठसठशीत व्यक्तिचित्रण नाही, की वेधक संवादरचना नाही. मग आहे काय? तर केवळ असंबद्धता, कृत्रिमता, अर्तक्यता आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे मनःस्ताप! यंदाच्या वर्षी सादर झालेल्या एकाही नव्या नाटकाने यापेक्षा वेगळे असे काहीही दिलेले नाही.

यंदा सादर झालेल्या नव्या नाटकात जी नवोदित लेखकांची नाटके पडली, त्यांबद्दल फारसे दुःख, फारसा मनःस्ताप होत नाही; पण आम्हा मराठी नाट्य रसिकांचे आशास्थान म्हणून ज्या खंद्या श्रेष्ठ लेखकांकडे आम्ही पाहतो, त्याचे काय? विद्याधर गोखल्यांसारख्या लेखकाचे उदाहरण घ्या. 'मदनाची मंजिरी' आणि 'अमृत झाले जहराचे' ही त्यांची दोन्ही नवी नाटके किती कमकुवत असावीत? त्याला काही मर्यादा? ही दोनही नाटके गचाळ आहेत, रटाळ आहेत.

अमृत झाले जहराचे या नाटकातील घटनांना काही ताळतंत्र? त्यामध्ये काही सुसूत्रता? नाव कशाला! गोखल्यांना वाटले, परकीय कथानकाचा आधार घेतला तर कदाचित 'जमून' जाईल. पण यात त्यांचा केवळ भ्रमनिरासच झाला. अर्थात केवळ त्यांचाच नव्हे; आम्हा प्रेक्षकांचा देखील! गोखल्यांना असलेली संवादाची, भाषेची देणगी खरोखर हेवा करण्याजोगी! पण ती अत्यंत तकलुबी, असंभाव्य कथानकासाठी खर्ची पडली आहे.

'मदनाची मंजिरी' या दुसऱ्या नाटकाची गोष्टही अशीच! त्यातही दोषांचा

बुजबुजाट आहे. या नाटकात नाव घेण्याजोगे काय असेल तर सुमन माटे यांचा अभिनय ! बस्स. जमेच्या बाजूला ही कलाकारांचीच कामगिरी प्रामुख्याने उभी असलेली दिसेल. नंतर कुठे नेपथ्य वगैरे गौण गोष्टी; पण सर्वांत मुख्य गोष्ट कथानक, संवादरचना आणि नाटय यांचे काय ? त्यांच्या नावाने शून्य ! मग गोखल्यांनी केले काय, तर Twelth Night चे मराठी रूपांतर केले. या पलीकडे दुसरे काय ? गोखल्यांचे स्वतंत्र कर्तृत्व कुठे आहे ? कर्तृत्वाला वाव असूनही गोखले थिटे पडतात. साहजिकपणे कलाकार, तंत्रज्ञ लक्षात रहातात.

गोखल्यांच्या दोन्ही नाटकांची ही त्रेधा, तर 'स्वामी' कार रणजीत देसाई यांच्या तानसेन या नाटकाचे हाल तर विचारू नका ! नाटय, प्रवेशरचना, संवादरचना, व्यक्तिचित्रण या एकाही गोष्टीची जणू काही त्यांना जाणीवच नाही, इतका ढिलेपणा, इतका गलथानपणा या नाटकात दिसतो. संगीत तानसेन केवळ लेखन दृष्टयाच कमकुवत, निकृष्ट आणि भिकार नाही तर अभिनय, दिग्दर्शन आणि संगीत या महत्त्वाच्या गोष्टीतही तितकेच टाकाऊ ठरले आहे. संगीत इतके बाळबोध आहे, की एकही पद लोकप्रिय तर सोडाच, पण साधे लक्षातही राहात नाही. राम मराठे तानसेन म्हणून शोभत तर नाहीतच, पण त्यांचे गाणेही स्वरसम्राट तानसेनचे गाणे वाटत नाही. मग बालकरामची गोष्टच कशाला ?अन्य कलाकार असेच अगदी लक्षातसुद्धा न राहाणारे ! एकंदरीत प्रारंभी फार मोठया अपेक्षा निर्माण करणारे 'तानसेन' अशा काही केविलवाण्या अवस्थेत आहे, की लवकरच ह्या नाटकाची रवानगी मृतप्राय नाटकात केली जाईल.

या तीन नाटकांच्या प्रयोगांबद्दल नसतील एवढया अपेक्षा 'ललितकलादर्श'च्या नव्या नाटकाबद्दल—"बहुरूपी हा खेळ असा" बद्दल होत्या. जवळ जवळ तीन वर्षांनी संस्थेचे नवे नाटक सादर केले जात होते. साहजिकच अनेक कसोटयांना उतरूनच ते स्वीकारले गेले असणार, सादर केले जाणार आणि म्हणूनच एक उत्कृष्ट प्रयोग पहायला मिळणार असा समज होता; पण ते केवळ मनोरथ ठरले. नाटक कमालीचे आपटले, इतके की मराठी नाटककारांनी, प्रेक्षकांनी, नटांनी, ज्यांना आदर्श समजावे अशा ललितकलेच्या चालकांबद्दल-श्री. भालचंद्र पेंढारकरांबद्दल घोर निराशा पदरी पडली. पेंढारकरांना नाटकाची असलेली समज सर्वश्रुतच आहे. भलतेसलते टाकाऊ नाटक ते हातातसुद्धा धरणारे नाहीत. असे असून हे नाटक त्यांनी सादर का करावे ? नाटक चालू झाल्यापासून संपेपर्यंत स्टेजवर चालू असलेल्या एकाही गोष्टीची संगती लागत असेल तर शपथ ! एकाही गोष्टीचा कार्यकारणभाव सांगता येईल तर नाव कशाला ? इतका काही गोंवळ नाटकात आहे की प्रेक्षक नाटक संपवून शेवटपर्यंत बसलाच, तर बाहेर पडला तर चक्कर खातच घरी जातो.

— एक त्रस्त प्रेक्षक

क्रीडा

# क्रिकेटमधील नवी 'डोकेफोड'

□ □ चार्ली ग्रिफिथ

१७ मार्च १९६२, बार्बाडोस संघाचा द्रुतगती गोलंदाज चार्ली ग्रिफिथ याच्या चेंडूवर खेळताना भारताचा कर्णधार नरी कॉन्ट्रॅक्टर जखमी झाला. कानशिलामागील भागावर चेंडू आदळून नरी खाली कोसळला. लीकॉक या न्यूरोसर्जनला पाचारण करण्यात आले व शस्त्रक्रिया करावी लागली. नरीला फ्रँक वॉरेलने रक्तदान केले. वॉरेलचे रक्त अशारीतीने नरीच्या अंगात शिरले. परंतु नरीची कसोटी-कारकीर्द त्या घटनेनंतर जवळजवळ संपुष्टात आली आहे.

आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या खेळात चार्ली ग्रिफिथचे नाव या घटनेने महशूर झाले. भारताविरुद्ध कसोटी सामन्यांत त्यानंतर ग्रिफिथला खेळवण्यात आले नाही.

परंतु नुकत्याच संपलेल्या विंडीज–ऑस्ट्रेलिया कसोटी सामन्यात ग्रिफिथने पुन: इतिहासाची पुनरावृत्ती केली. पहिल्याच कसोटी सामन्यात नॉर्मन ओनीलच्या बरगड्यांवर त्याने प्रहार केला व खेळ थांबला. ओनील पुन: खेळू लागला, परंतु ऑस्ट्रेलियाचा भूतपूर्व कर्णधार बेनॉ हा ऑस्ट्रेलियन संघाबरोबर वेस्टइंडीजला गेलेला असल्यामुळे त्याने वृत्तपत्रांत ग्रिफिथ हा चेंडू फेकतो व त्याची चेंडूफेक ही संशयास्पद आहे, असा पुकारा लगोलग केला.

ज्या दिवशी हे मत वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाले, त्यादिवशी ऑस्ट्रेलिया ३८३ धावांनी वेस्टइंडीजच्या मागे होता. त्यांचे दुसऱ्या डावातील दोन फलंदाज बाद झाले होते. वृत्तपत्रांतील टीकेमुळे हॉल व ग्रिफिथ यांनी अधिकच भयानक गोलंदाजी केली व ऑस्ट्रेलियाने पहिला कसोटी सामना गमावला.

### ग्रिफिथ नसता तर ?

ग्रिफिथविरुद्ध लगेच ऑस्ट्रेलियन वृत्तपत्रांतून जोराची टीका सुरू झाली, परंतु चौथ्या कसोटी सामन्यात पुन: ओनीलच ग्रिफिथच्या चेंडूवर जखमी होऊन दौरा तसाच टाकून मायदेशी परतला, तेव्हा या टीकेला उधाणच आले. आता तर ओनील याने असे जाहीरच करून टाकले, की पुन: तो ग्रिफिथविरुद्ध कधीही खेळणार नाही. कारण ग्रिफिथ हा चेंडू फेकतो, ही गोष्ट मुळीच संशयास्पद राहिलेली नाही.

आता असेही सुचविण्यात येत आहे, की ग्रिफिथ हा विंडीज संघात नसता, तर कसोटी सामने जिंकणे विंडीजला शक्य झाले नसते. (दोन सामने विंडीजनी जिंकले.

एक ऑस्ट्रेलियाने व दोन अनिर्णीत राहिले.) हे मत फारसे ग्राह्य मानता येणार नाही. कारण सोबर्स, कन्हाय, नर्स, हंट, सॉलोमन, हेंड्रिक, बुचर, गिब्स, हॉल यांचा विंडीज संघ जगातील कोणत्याही संघाला आज भारीच आहे, यात संशय नाही.



चार्लि ग्रिफिथ

आपटबार टाकून किंवा 'लेगस्टंप'वर गोलंदाजी करून पाय रोवून बसलेल्या फलंदाजाला गांगरून टाकण्याचे तंत्र गेल्या काही वर्षांत फारच प्रगत झाले असले, तरी या तंत्राचा उगम डॉन ब्रॅडमनमुळेच झालेला आहे.

उशी घेणारा चेंडू हुक करण्याच्या प्रयत्नात ओनील किंवा नरीसारखा फलंदाज जखमी होतो; तेव्हा काही प्रमाणात तो अपघातही असतो. नरीच्या बाबतीत तर ग्रिफिथच्याविरुद्ध फारशी टीकाही झाली नाही. कारण विंडीजविरुद्ध आपण, "कीस झाडकी पत्ती!" ठरल्यामुळे भारतीय संघाला आवरण्यासाठी अशी काही क्लृप्ती विंडीज संघाने केली असेल, असा आरोप टिकण्यासारखाच नव्हता. ओनीलबाबत बोलायचे तर दौऱ्याच्या सुरवातीलाच फिंगल्टन या जुन्या ऑस्ट्रेलियन खेळाडूने इशारा दिला होता,

"He is his own worst enemy. He has his fears and nervous reactions. He seems to submit to them." [ओनीलचे अंगभूत दोषच त्याचे शत्रू आहेत. त्याला काही वेळा भीती ग्रासते, तर केव्हा तो मानसिक ताणात गुरफटतो. या दोन्ही गोष्टींतून तो निसटू शकत नाही.]

यावरून ग्रिफिथच्या चेंडूवर जखमी झालेल्या ओनील व नरी कॉन्ट्रॅक्टर या दोघांचाही काही दोष असण्याची शक्यता तरी निर्माण होते.

## ब्रॅडमनवरील हा उतारा

परंतु मूळ हा अनैसर्गिक खेळ जन्माला आला, तो डॉन ब्रॅडमनच्या नैसर्गिक नैपुण्यामुळें!

१९३० साली ब्रॅडमन इंग्लंडच्या दौऱ्यावर गेला; तेव्हा केवळ २१ वर्षांचा होता. वुडफुलच्या नेतृत्वाखाली या दौऱ्यात ब्रॅडमनने आपली सरासरी १३९ ठेवली. कल्पना करा, प्रत्येक सामन्यात द्विशतक मारल्याखेरीज हे शक्य होते काय? २३६, १३१, २५४, ३०९ हे त्याचे कसोटीतील धावांचे आकडे होते.

अर्थातच कसोटीमालिका जिंकून ऑस्ट्रेलियन संघ परत गेला. पुढे दोन वर्षांनी १९३२–३३ मध्ये जेव्हा इंग्लंडचा संघ जार्डिनच्या नेतृत्वाखाली ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर निघाला, तेव्हा जार्डिनपुढे प्रश्न होता, की ब्रॅडमनचे काय करायचे? ब्रॅडमनचा बळी गेल्याखेरीज इंग्लंडला ऑस्ट्रेलियन संघ उखडणेच अशक्य व ब्रॅडमन बाद होणे म्हणजे मोठेच दुरापास्त काम!

ब्रॅडमनला वचक बसविण्यासाठी काही तरी करणे आवश्यक होते व जार्डिन याने ही कामगिरी करण्यासाठी इंग्लंडचा द्रुतगती गोलंदाज हॅरॉल्ड लारवुड याच्याशी कानगोष्ट केली. लारवुड याने फलंदाजाच्या शरीराच्या दिशेने चेंडूफेक करावी (Body line) व लेगला चार ते पाच क्षेत्ररक्षक ठेवून ब्रॅडमनला टिपावा, असे ठरले. एकही चेंडू ऑफला नाही. ओळीने सहाही चेंडू फलंदाजाच्या शरीराच्याच रोखाने टाकण्याचे ठरले. याला गोंडस नाव दिले गेले – लेग थिअरी (Leg theory)! ब्रॅडमनविषयी लारवुड काय म्हणतो, ते आधी पाहू. लारवुड सांगतो–

"आजकालच्या क्रिकेट–शौकिनांना ब्रॅडमन ही काय अचाट वल्ली होती, याची कल्पना येणार नाही. मी असे वारंवार अलीकडे ऐकतो, की नॉर्मन, ओनील, टेड-डेक्स्टर, सर फ्रॅन्क वॉरेल हे ब्रॅडमनशी तुलना करावे, असे फलंदाज आहेत. या चांगल्या फलंदाजांना खाली पाडण्याचा प्रयत्न मला करावयाचा नाही, परंतु माझ्या मते यांपैकी कुणीही ब्रॅडमनच्या गल्लीतही फिरकू शकणार नाही."

अशा या ब्रॅडमनला लारवुड याने कोणत्या प्रकारची गोलंदाजी टाकायचे ठरले, ते पाहा. लारवुड सांगतो–

"माझी शरीराक्रमक चेंडूफेक म्हणजे आखुड टप्प्यांचे आपटबार असत. उशी देऊन चेंडू फलंदाजांच्या रेषेतच लेग–स्टंपवर आदळू पाहात. सहा क्षेत्ररक्षकांची 'छत्री' लेगच्या दिशेला उडालेल्या झेलाच्या स्वागताला सिद्ध असे. चौकार सीमेवर दोन क्षेत्ररक्षक चेंडू हुक केला, तर झेलासाठी उभे असत."

अशा चेंडूफेकीपुढे ऑस्ट्रेलिन खेळाडू हळूहळू नामोहरम झाले. तिसऱ्या कसोटी सामन्यात इंग्लंडला ३४१ धावांत ऑस्ट्रेलियाला दुसऱ्या डावात बाद करावयाचे होते. यांपैकी सहा गडी गमावून २०० हून अधिक धावा झालेल्या होत्या. बर्ट ओल्डफिल्ड हा चाळीस धावा काढून पाय रोवून उभा राहू लागला, हे पाहातच जार्डीनने लारवुडला इशारा दिला व लारवुडने आपले अस्त्र बाहेर काढले.

**लारवुडचे अस्त्र**

त्याला गांगरवण्यासाठी लारवुडने आखूड टप्प्यांच्या द्रुतगतीचा चेंडू टाकला.

शरीराच्या दिशेने उशी घेतलेला हा चेंडू हुक करण्याच्या प्रयत्नात ओल्डफिल्डचा टोला हुकला व चेंडू कपाळावर आदळून त्याच्या कवटीचे हाड मोडले. ओल्डफिल्ड तत्काळ बॅट टाकून कपाळ दोन्ही हातांत धरून झोकांड्या खाऊ लागला व दूर अंतरावर खाली कोसळला.

मात्र खाली पडता पडता ओल्डफील्ड जवळ आलेल्या लारवुडला पाहून उद्‌गारला," It is not your fault Harold. " (हॅरॉल्ड, याच्यात तुझा दोष नाही.)

परंतु ऑस्ट्रेलियाचा कर्णधार वुडफुल याला संशय आलेला होता, की बॉडीलाईन चेंडूफेड करण्याचे तंत्र जार्डिन व लारवुड परस्पर विचारविनिमयाने अवलंबून फलंदाजांना शेकवीत आहेत. कारण वुडफुलच्या बरगड्याही लारवुडने शेकवल्या होत्या. पॉनस्‌पोर्डला छातीवर, पोटावर अकरा ठिकाणी निळे चट्टे उठले होते. ब्रॅडमन असा चेंडू मारण्याच्या प्रयत्नात लेगला झेल देऊन अचूक बाद होत होता. एकदा तर शरीरावर आलेला चेंडू अडवताना पुढे केलेल्या बॅटवर एवढ्या जोराने आदळला, की वुडफुलच्या हातातील बॅट त्या धक्क्याने खाली पडली.

या दौऱ्यात लारवुडने ४।। कसोटी सामन्यांत ३३ बळी घेतले. फक्त बळीमागे घावा देऊन यांतले १८ त्रिफळा–बाद होते. बाकीचे झेलबाद व पायचीत होते. ऑस्ट्रेलियाने ही कसोटीमालिका गमावली.

परंतु ऑस्ट्रेलियन कर्णधार वुडफुल याने ओव्हलवरील सामना चालू असतानाच सांगितले होते.–

" There are two teams out on the oval. One is playing cricket other is not. "

[ओव्हलवर दोन संघ आज खेळताना दिसत आहेत. परंतु त्यांतला फक्त एकच संघ क्रिकेट खेळत आहे.]

## इतिहासाची पुनरावृत्ती

आता ३० वर्षांनंतर पुन: एकदा चार्ली ग्रिफिथ याने ऑस्ट्रेलियन फलंदाज नॉर्मन ओनील याला क्रिकेटमधून हद्दपार करून इतिहासाची पुनरावृत्ती चालवली आहे. तीस वर्षांपूर्वी लारवुडवर बंदी घालून इंग्लंडने क्रिकेट क्षेत्रात बिघडवलेले वातावरण नवळू दिले. यावेळी असा सुविचार वेस्टइंडीज कंट्रोल बोर्डाला सुचेल काय ?

निदान असा सुविचार सुचेपर्यंत विंडीजचा संघ भारतात येत नाही, हे बरेच झाले म्हणायचे. हा महागडा दौरा अपमानास्पद अटी लादून घेऊन घडवून आणण्यापेक्षा रद्द करावा, असेच मत आम्ही मांडले होते. फक्त कुठल्याही प्रश्नावर निर्णय घ्यायला भारत सरकारला तत्पूर्वी खेळखंडोबा करण्याची जी सवय आहे, त्यामुळे आंतरराष्ट्रीय क्रिकेटक्षेत्रात आपलाच बदलौकिक या प्रकरणात झाला आहे. बाकी आता कुठल्या क्षेत्रात आपला लौकिक राहिला आहे म्हणा !

आयूब मारी खडे, चाऊचे ओरखडे
चलनासाठी हंबरडे, असा इंडिया टुडे !!

• • •



‘सांग कसे बसलो’
रमेश देव आणि वर्षा

राजा परांजपेनिर्मित

# पडछाया

## बाळबोध खलनायकाचे रहस्य

### सोबत नाचांची स्पेशल फिल्म

‘राजा परांजपे यांचे १९६५ चे रहस्यपूर्ण चित्र’ पाहायचा योग कालपरवाच आला! माझे आवडते कथाकार अरविंद गोखले यांची कथा असल्याचे समजले, म्हणून मोठ्या उत्सुकतेने चित्रपट पाहिला. त्यातूनही राजाभाऊंचे चित्र म्हणून अपेक्षा उंचावल्या होत्या, पण निराशाच झाली.

एक डॉक्टर ( मनोहर मोहिते ) व एक ‘ गोवेकरीण ’ नर्तकी ( मेनका ) दोघे लग्न करतात. संसार सुखाचा होतो. कुमार आणि कला ही दोन मुले होतात. कला डॉक्टर होते. कुमार प्रणयपंढरीची उपासना करण्यात स्वतःला धन्य समजतो. इथ-पर्यंत सगळे सुरळीत चालते.

मेनकेला एक विचित्र सवय असते. फेल्टहॅट घातलेल्या माणसाची पडछाया पाहिली, की तिला घाम फुटायचा, कापरे भरायचे. तिच्या नृत्यसाधनेबद्दल तिचा सत्कार योजिला जातो. तेथे तिला फेल्टहॅट घातलेल्या अनेक माणसांच्या पडछाया दिसतात. तिच्या मस्तकातील चक्रे वेगाने फिरू लागतात. ती जिन्यावरून पडते. अन्तर्गत रक्तस्राव होऊन ती मरते. मरताना नवऱ्याला सांगते, ‘ कुमार आणि कला यांपैकी एक मूल तुमचे नाही. ’ कोणते मूल ते सांगायच्या आतच ती शेवटचा श्वास टाकते. डॉक्टर संशयपिशाच्चान पछाडला जातो...आणि एक दिवस...

पण ह्या कथेतील रहस्य मी तुम्हांला सांगू इच्छित नाही. नाहीतर मग या चित्रपटात पाहाण्यासारखे तुम्हाला काहीच उरणार नाही.

आता काही दोषस्थळे ! मेनकेला ' मेंदूतील अन्तर्गत रक्तस्राव ' होतो ना ? या आजाराचा रोगी जागचा उठूच शकत नाही आणि ही मेनका खुशाल उठते; चालते; पत्रदेखील लिहिते ! कमलाकर कामतच्या शब्दांवर मनोहर एवढा विश्वास ठेवेल, असे वाटत नाही. सतत पाच वर्षे सूडाची आग मनात भडकत असताना, एका लहान पोराच्या किंचाळण्याने कामतचा हृदयपालट होतो, हेही असंभवनीय वाटते. कुमार आणि कला यांच्या वयात जास्त अंतर पाहिजे. एका लहान जीव असलेल्या कथेवर चित्राची उभारणी झाली असल्याने त्याला पाच नाचांची जोड देऊन हे कथेचे निर्मळ दूध, नीर–मेळ करून टाकलेले आहे. पहिले भिल्लीण–नृत्य तर पाहावत नाही.

## राजाभाऊंची तारीफ

दत्ता डावजेकर यांनी पार्श्वसंगीत चांगले दिले असले, तरी ' पाठलाग 'च्या मानाने गाणी फिकी वाटतात. दत्ता गोर्ले यांचे छायाचित्रण मात्र उत्कृष्ट आहे. अभिनयाच्या बाबतीत रमेश देव यांनी उच्चांक गाठला आहे. डॉ. मनोहर त्यांनी अगदी जिवंतपणे साकार केला आहे. उत्कृष्ट ! काशिनाथ घाणेकरही चमक दाखवून जातात. सीमा, रत्ना यांना स्कोप कमीच. नवतारका वर्षाने आपली अवघड भूमिका समजूतदारपणे पार पाडली आहे. वंडरबॉय सचिनहि गंमत करून जातो. मेनकेच्या तोंडून बाहेर पडणारे शब्द तिचे वाटत नाहीत. दिग्दर्शनाबद्दल राजाभाऊंची तारीफ करावी तेवढी थोडीच ! बोका पिल्ले खातो व कावळीचे कोटर, या प्रतिमाही काळजाला हात घालतात.

भावना, वर्षा यांसारखे नवेनवे चेहरे राजाभाऊ यापुढेही मराठी चित्रपटसृष्टीला देत राहतील अशी आशा !

एकंदरीत हे चित्र ' पाठलाग 'च्या तोडीचे नसले, तरी प्रत्येक मराठी प्रेक्षकाने पाहावे.

पहिले नृत्य पाहावतच नाही. मध्येच कंटाळा येईल. रमेश देव यांना पपा अशी हाक मारणारी सीमा पाहून मोठी गंमत वाटेल. तरीही असंख्य भिकार हिंदी चित्रपटांपेक्षा हा चित्रपट उजवाच आहे.

**लीला काळे**

[एस्. एस्. सी. १९६५ ची नॅशनल स्कॉलर व बिडकर पारितोषिक विजेती]

# भिंतीच्या तुंबड्या

**• बायको नको, कुत्रा हवा !**

कालिदासाने मोठ्या गोड, पण भ्रामक शब्दांत वर्णन केलेले पत्नी-माहात्म्य फट म्हणता घटस्फोट मिळणाऱ्या अमेरिकेतल्या नवऱ्यांना मान्य नसावे. परवाच वर्तमान-पत्रांत वाचले, की एका अमेरिकन जोडप्याला कोर्टाने घटस्फोट दिला, तेव्हा घरातल्या कुत्र्याची मालकी बायकोकडे गेली. लगेच नवऱ्याने अर्ज केला— "कुत्र्याची मालकी जरी बायकोकडे गेली असली, तरी त्याला भेटण्याचा मला हक्क असावा." कोर्टाने होकार दिला, पण म्हटले, "कुत्र्याच्या भेटीत तुमचे तुमच्या बायकोशी पुन: भांडण होऊ नये, म्हणून सोबत कुणाला तरी घेऊन येत जा." आता बोला ! बायकोला सोडून दिली—पण कुत्र्याला नाही. प्रेम आंधळे असते, याचा आणखी एक पुरावा. बायको अन् कुत्रा यांतला फरक त्याला दिसला नाही. आता प्रश्न असा, की कुत्र्याच्या भेटीत आपल्या भूतपूर्व नवऱ्याने कुत्र्याला आपल्याविरुद्ध काही सांगितले, असा बायकोला संशय आला म्हणजे ? आधीच बायकांची जात संशयी अन् त्यातून आपल्या प्रिय कुत्र्याचे प्रेम आपला अप्रिय नवरा हिरावून घेत आहे, असे बाईला वाटले तर ? आधीच 'कुत्र्याचे जिणे' वाईट आणि त्यातून असा काही पेचप्रसंग समोर उभा राहिला, म्हणजे बिचाऱ्या कुत्र्याचे मानसिक हाल (दुसरा) 'कुत्रा' देखील खाणार नाही. अमेरिकन कुत्राच तो, शेवटी एखाद्या मनोवैज्ञानिकाकडे धाव घ्यायचा.

प्रस्तुत कुत्र्याची विचित्र परिस्थिती खुद्द कोर्टाच्याही लक्षात आली. निवाडा दिल्यावर कोर्ट म्हणाले, " गेल्या १५ वर्षांत इतकी विचित्र केस माझ्यासमोर आली नाही." म्हणजे १५ वर्षांपूर्वी काय झाले ? "१५ वर्षांपूर्वी एका घटस्फोटित शेतकऱ्याने बायकोच्या ताब्यात गेलेल्या १६ गाईंना भेटण्याचा हक्क मागून घेतला होता !" शाब्बास ! बायको 'गरीब गाय' न ठरल्याने बिचाऱ्या शेतकऱ्याची सोळाच्या सोळा गाईंशी तुटातूट व्हावी त ? हे विरहाचे सोळापट दुःख त्याने कसे सहन केले असते ? अर्थात त्याने भेटीचा हक्क राखून ठेवला, हे साहजिकच होते; पण सोळा गाईंशी सांघिक पुनर्मिलनाचा सोहळा बायकोने लाक्षणिक शिंगे उगारल्यावर नीटपणे पार पडत असे की नाही, याची माहिती उपलब्ध नाही.

**• सुसंस्कृत माकडे**


संस्कृती म्हणजे काय ? साधारणपणे आपण जे करतो अन् माकडे जे करीत

नाहीत ती संस्कृती, अशी एक व्याख्या आहे; पण ती आता चुकीची ठरू पाहात आहे. म्हैसूरजवळ म्हणे एक अमेरिकन शास्त्रज्ञ एका विशिष्ट जातीच्या माकडांच्या ' सामाजिक ' सवयीचे निरीक्षण करीत आहे. हे निरीक्षण निर्वेध व्हावे अन् माकडांनी 'आपल्यातलाच एक ' समजावे, म्हणून त्याने त्या माकडांप्रमाणेच दाढी-मिशा ठेवल्या आहेत. एकदा काय झाले, त्या माकडांच्या म्होरक्याचा एक दात पडला. बट्याने काही दिवस तोंड बंद ठेवून कुणाला पत्ता लागू दिला नाही, पण एके दिवशी बिंग फुटलेच. तत्काळ इतर माकडांनी त्याच्याविरुद्ध काहूर माजवून त्याला एकदम निकृष्ट स्थानावर ढकलले. आता या वागण्यात अन् सुसंस्कृत माणसांच्या वागण्यात कुठे फरक आहे ? आज लठ्ठ पगार असलेला एखादा माणूस उद्या बेकार झाला, म्हणजेच त्याचा दात पडला, तर आपण माणसे आणखी निराळी कशी वागतो ? तेव्हा माकड-समाजाचे सम्यक् ज्ञान होण्यासाठी या अमेरिकन शास्त्रज्ञाला म्हैसूरच्या जंगलात दाढी-मिशा वाढवून राहण्याची काहीच जरूरी नव्हती. मुंबईच्या कुठल्याही चाळीत राहून त्याला माकडांच्या सामाजिक विचारसरणीची यथार्थ कल्पना आली असती.

## ● " माणूस " चालविणारे यंत्र ?

जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी कृष्णाच्या ऐवजी कॉंप्यूटर दिसण्याचे दिवस आलेत बघा ! कॉंप्यूटर यंत्र एकीकडे गणित करते, तर दुसरीकडे काव्य करू शकते; एकीकडे त्याची मंत्री म्हणून चाचणी होत आहे, तर दुसरीकडे त्याला राजपद देण्याचीही काहींची तयारी आहे; पण कॉंप्यूटर वार्ताहर किंवा संपादक होऊ शकेल काय ? परवा लंडनमध्ये भाषण करताना एक अमेरिकन पत्रकार म्हणाला, " कधीच नाही !" आता हे काय सांगायला हवे का ? अहो, " माणूस " चालवायला माणूसच हवा, यंत्र कसे चालेल ? समजा, उद्या असे घडले, की ज्यांचे ज्यांचे लिखाण ' माणूस ' कडून साभार परत गेले आहे, अशा सर्वांनी एक विशाल संघटना स्थापन करून माजगावकरांना पदच्युत केले अन् कॉंप्यूटरला त्यांच्या संपादकीय खुर्चीवर बसविले, तर काय होईल ? होणार काय, आमच्यासारख्या ज्या गळेपडूंचे लिखाण माजगावकर ' माणूस ' या नात्याने मिडेला बळी पडून तरी छापतात त्यांचाही " कीर्तीसाठी कागद काळा करण्या "चा मनसुबा पार कोलमडून पडायचा' अन् मग रिकामे रकाने कॉंप्यूटर स्वतःच्या नवकाव्याने भरून काढीत बसायचा.

—सुधाकर राजे


प्रवासी बन्धूंनों...
आपलें सहकार्य
गाडींत लागणारी
आग
टाळूं शकेल.
निर्देशित
आगप्रतिबन्धक नियमांचें
पालन करा.
पेटती सिगरेट फेकण्यापूर्वी विझवा किंवा राखदाणीचा (अॅश ट्रे) उपयोग करा.
डब्यांत स्टोव्ह पेटवूं नका.
आपल्या सामानांत ज्वालाग्राही पदार्थ नेऊं नका.
PETROL
ACID
प्रवासांतील सुरक्षिततेच्या हेतूने मध्य रेल्वे द्वारा प्रकाशित

## ....जगाच्या पाठीवर

[ पृष्ठ ७ वरून ]

ऑपरेशनला जेवढे पैसे लागतात, तेवढेच या ऑपरेशनसाठी लागतात.

शेवटी प्रश्न उरतो तो उरोजांचा ! शाकुंतलातील शकुंतला आपल्या सखीस ' चोळी फार घट्ट होते, ' असे म्हणते, यामागे दडलेल्या अर्थाची लज्जत विशेष उठावदार उरोज नसलेल्या जपानी युवतींना कशी कळणार ? पण येथेही प्लॅस्टिक या युवतींच्या मदतीसाठी हात जोडून उभे असतेच ! आपल्या उरोजांवर प्लॅस्टिकचे कृत्रिम कवच घालून ' रूपगर्विता ' म्हणून या जपानी स्त्रीला मिरवता येते.

गर्भपाताचा तर जपानमध्ये सुकाळच आहे. हाती आलेल्या आकड्यांवरून दरवर्षी अधिकृतरीत्या केलेल्या गर्भपातांची संख्या वर्षाकाठी दहा लक्षांवर जाते आणि पडद्याआड केल्या जाणाऱ्या गर्भपातांची संख्या पाच लक्षांच्या आसपास असेल. आपल्या अर्भकाची हत्या डोळ्यांसमोर पाहूनदेखील या जपानी युवतीला नाइलाजाने कुमारिका म्हणून लग्नाच्या बाजारात जाऊन उभे राहावे लागते. दुसरा पर्यायच नसतो.

विज्ञानामुळे जपानी युवतीचा पुनर्जन्म होऊन ती ' प्लॅस्टिकमय ' बनत असली, तरी त्यामुळे एक वेगळीच चिंता ग्रासू पाहात आहे. याशिवाय प्लॅस्टिकच्या उरोजावरील कवचामुळे छातीस कॅन्सर होण्याची भीती डॉक्टरांनी व्यक्त केली आहे. तसेच प्लॅस्टिकमुळे प्राप्त होणारे हे सौंदर्य महागडे व धोकादायक आहे.

निसर्गदत्त सौंदर्य हेच खरे सौंदर्य. कृत्रिमतेने चिकटविलेल्या सौंदर्याला त्याची कशी सर येणार ? प्लॅस्टिकने नखशिखान्त मढू पाहणाऱ्या जपानी युवतींचे असेच झाले आहे. विश्वाच्या बाजारात सौंदर्याचा आज लिलाव होतो आहे; त्यात आपली वर्णी लागण्यासाठी एकमेकांत स्पर्धा लागली आहे. या स्पर्धेत आपला काही टिकाव लागावयाचा असेल, तर अगतिक झालेल्या जपानी युवतीला अपरिहार्यपणे हे कृत्रिम उपाय योजावेच लागणार.

समृद्धीचे वरदान देणाऱ्या विज्ञानाचा हा शापच म्हटला पाहिजे !


□

• हेरगिरीच्या नवीन तऱ्हा

आधुनिक राजकारणात शत्रूच्या हालचाली व डावपेचांची माहिती मिळविण्यासाठी हेरगिरी हे एक महत्त्वाचे अंग बनले आहे. नाना मार्गांनी नाना युक्त्यांचा अवलंब करून हेर ही माहिती मिळवीत असतात. रशियासाठी हेरगिरी केल्याबद्दल ब्रिटिश नागरिक फ्रँक बोसार्ड यास नुकतीच एकवीस वर्षांची शिक्षा झाली. रशियाकडून त्याला या कामासाठी पाच हजार पौंड मिळत होते. बोसार्डला जुनी नाणी जमविण्याचा छंद होता. रशियन त्याला दुर्मिळ नाणी पुरवीत. बोसार्ड हा काही त्यांचा प्रमुख हेर नव्हता, पण त्याच्या या छंदाचा उपयोग करून घेऊन त्याच्या मार्फत रशियनांनी आपल्या हस्तकांशी संधान बांधले. आपणांवर पाळत ठेवली जात आहे, असा संशय बोसार्डला आला होता व आपल्या हालचाली तो अधिक सावधगिरीने करू लागला होता. माझ्याकडून केवळ संख्येने फार माहिती मिळविण्याची अपेक्षा करण्यापेक्षा मी जी माहिती मिळवितो, ती किती महत्त्वाची आहे ते पाहा, असे त्याने रशियनांना सांगितले होते; पण त्यांचे समाधान झाले नाही. त्यांनी त्याच्याकडून अधिक कामाची मागणी केली. अखेर काही फायलींतील कागदपत्रांचे फोटो घेण्यासाठी त्या फायली आयव्हॅनो हॉटेलमध्ये नेण्याचे साहस त्याने केले आणि त्यात तो पकडला गेला.

बोसार्डमार्फत रशियनांना खरोखरच काही महत्त्वाची गुप्त माहिती मिळाली असण्याचा संभव नाही. अण्वस्त्रे किंवा ए जे १६८ या अँग्लो-फ्रेंच क्षेपणास्त्राचे गुपित मिळविण्याचा रशियाचा प्रयत्न होता, पण या अस्त्रासंबंधींच्या फायली एका ठिकाणी खास बंदोबस्तात ठेवल्या असून, तेथे बोसार्डला प्रवेश मिळणे शक्य नव्हते.

दुसऱ्या देशाचे हेर पकडणे याच कामावर लक्ष केंद्रित करणारी 'एम. आय.–५'



हरिभाऊ विश्वनाथ

संगीत वाद्यालय,

दादर, मुंबई २८

संघटना इंग्लंडमध्ये आहे, तर शत्रूची गुपिते चोरणे हे कार्य 'एम. आय–६' ही दुसरी संघटना करते. एम. आय. ५ चे अधिकारी स्वत: कधी धरपकड करीत नाहीत. त्यांचे काम फक्त हेरांच्या हालचालींसंबंधी भरपूर माहिती व पुरावा मिळविण्याचे. नंतर या पुराव्याचे आधारे स्कॉटलंडयार्डचे खास पोलीस छापे घालून अटक करतात. ब्रिटिश व अमेरिकन कार्यपद्धतीतील मुख्य फरक म्हणजे ब्रिटनमध्ये हे कार्य गाजावाजा न होता चालते व राजकारणापासून ते अगदी अलग राखले जाते. 'एम. आय. ५' चा डायरेक्टर जनरल आणि 'एम. आय–६' चा कंट्रोलर यांची नावेसुद्धा गुप्त राखली जातात. फक्त पंतप्रधानांना त्यांच्या फायली उपलब्ध होऊ शकतात.


रशियन हेरांचे मुख्यत: तीन वर्ग पाडता येतील. (१) धंदेवाईक हेर हे रशियातच जन्मलेले असतात. उदा०–गार्डन लान्सडेल. १९६१ साली पोर्टलँड आरमारी तळाचे कटात त्याला २५ वर्षांची शिक्षा झाली होती. पुढे ग्रेव्हिल वायने या ब्रिटिश हेराचे बदली त्याला रशियाचे स्वाधीन करण्यात आले. (२) राजकीय सहानुभूती असलेले हेर. उदा०–क्लॉसफुश किंवा जॉर्ज ब्लॅक. ब्लॅकला १९६१ साली ४२ वर्षांची शिक्षा झाली. (३) धमक्या, दडपणाचे मार्गाने माहिती काढणारे हेर. उदा०–विल्यम व्हासल. त्याला १९६२ साली १८ वर्षांची शिक्षा झाली.

एखाद्या देशातील प्रकाशित वाङमयाची काळजीपूर्वक छाननी करूनही कित्येकदा महत्त्वाची माहिती मिळविली जाते. साधारणपणे वीस टक्के माहिती अशा प्रकारे गोळा केली जाते. रशियन या बाबतीत तरबेज आहेत. एखाद्या अमेरिकन विमान कंपनीच्या जाहिरातीतूनसुद्धा त्यांना त्यांच्या दृष्टीने महत्त्वाची माहिती सहज मिळते, पण रशियातील विमान–वाहतुकीसंबंधी किंवा उत्पादनासंबंधी अशीच माहिती दुसऱ्या देशाच्या नागरिकास देण्याचा प्रयत्न एखाद्या रशियनाने केला, तर त्याला त्यासाठी फाशी जावे लागेल. रशियनांना मिळणारा दुसरा एक फायदा म्हणजे ब्रिटन–अमेरिकेत राजकीय निर्वासित म्हणून ते राहू शकतात, पण इतर परदेशी नागरिकांना रशियात मात्र तसा थारा मिळू शकत नाही.

हेरगिरीतील अगदी अलीकडचे तंत्र म्हणजे मानवनिर्मित कृत्रिम उपग्रहाचा उपयोग त्यासाठी केला जात आहे. अमेरिका आठवड्याला एक तरी उपग्रह या उद्देशाने सोडीत असावी, असा या क्षेत्रातील तज्ज्ञांचा अंदाज आहे व रशियाही तितकेच उपग्रह पाठवीत असावा. हे उपग्रह पाठविल्याचे अर्थातच जाहीर केले जात नाही. शत्रुप्रदेशाचे फोटो घेण्याची यंत्रणा त्यात असते. आपली कामगिरी करून नियोजित स्थळी हे उपग्रह उतरतात, पण यंत्रणेत काही तरी बिघाड होऊन यातला एखादा उपग्रह जमिनीवर नियोजित स्थळी न उतरता समुद्रात पडला, तर त्याने घेतलेले फोटो शत्रूच्या हाती न लागता नष्ट व्हावेत, अशी योजना त्या उपग्रहात केलेली असते.

## ● सुबत्तेची दुखणी

आशिया-आफ्रिकेतील मागासलेली राष्ट्रे समृद्धीच्या, विकासाच्या मोठमोठ्या योजना आखीत आहेत, पण समृद्धी व सुबत्ता जेथे हात जोडून उभ्या आहेत, अशा राष्ट्रांपुढे आता निराळेच प्रश्न उपस्थित झाले आहेत. भौतिक समृद्धी व सुबत्ता लाभली तरी मानसिक सुख, समाधान व शांतता नाही. आपल्या व्यथांचा विसर पडावा, यासाठी कोणी मद्याकडे वळत आहेत, तर कोणी औषधे घेत आहेत. अमेरिकेत साठ हजार लोक अशी औषधे घेतात, तर पश्चिम जर्मनीत ही संख्या चार हजारांवर आहे. या दोन देशांच्या तुलनेने ब्रिटनमधील प्रमाण फार कमी असले तरी येथेही ही लागण विशेषतः तरुणांत वाढत आहे. दहा वर्षांत हे प्रमाण दुपटीने



" कैंवो हरवून बसलाय् ! अर्धा तास झालाय् ! शोधतोय्—मला वाटत नाही आपला एवढ्यात नंबर लागेल! – "

वाढले. पाच वर्षांपूर्वी वीस वर्षांखालचा एकही तरुण अशी औषधे घेत नव्हता, पण गेल्या वर्षी असे वीस–चोवीस तरुण आढळले. कोकेन, हेरॉइन, पेप गोळ्या घेणारांचे प्रमाण वाढत आहे. अमेरिकेत हेरॉइनचा चोरटा खप वर्षाला १६५ कोट रुपयांपेक्षा अधिक आहे. सुरवातीला परिस्थितीचा विसर पडण्यासाठी हेरॉइनच्या एका ग्रेनचा एकचोविसावा भागही पुरतो, पण पुढे तोच परिणाम टिकविण्यासाठी दिवसाला २० ग्रेन हेरॉइन घेणारे लोकही आढळतात.

## ● न्यूयॉर्कचा मेयर

न्यूयॉर्कचे मेयरपद म्हणजे अमेरिकेचे अध्यक्षांच्या खालोखाल महत्त्वाची जागा समजली जाते. वर्षाला दोन लाख रुपयांपेक्षा अधिक पगार, शिवाय राहायला उत्कृष्ट जागा आणि भत्ते असूनही हे पद स्वीकारण्यास फारच थोडे लोक तयार असतात. कारण त्या अधिकारपदावर येणाऱ्या व्यक्तीला फार कठीण जबाबदाऱ्या फार पाडाव्या लागतात. न्यूयॉर्कमध्ये निग्रो, पुर्टोरिकन, कॅथालिक, ज्यू, इटालियन वगैरे अनेक देशांचे, धर्मांचे, पंथांचे व वंशांचे लोक आहेत. या परस्परविरोधी गटांशी जमवून घ्यावे लागते. तसेच या शहराला अनेक वर्षे ग्रासणाऱ्या लाचलुचपतीविरुद्ध कडक उपाय योजण्याचे धैर्यही लागते. न्यूयॉर्कमध्ये गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे. गलिच्छ वस्त्या वाढत आहेत. मादक पेयांचे सेवन करणारांचा प्रश्न सर्वांत बिकट झाला आहे. शिक्षणपद्धती हा टीकेचा विषय झाला आहे. वाहतुकीच्या सोयी अपुऱ्या पडत आहेत आणि नागरिकांमध्ये वाढती उदासीनता आहे. हे सर्व प्रश्न नेटाने सोडविण्यासाठी ठामपणे उपाय योजणारी व्यक्ती मेयरपदी हवी. मेयरपद म्हणजे मान, केवळ मानाची जागा, खरे अधिकार कमिशनरला अशी आपल्याकडील परिस्थितीसारखी परिस्थिती न्यूयॉर्कमध्ये नाही.


कर्तबगार मेयर न्यूयॉर्कला अनेक वर्षांत मिळालेला नाही. १९३३ ते १९४५ या काळात ला गार्डिया न्यूयॉर्कचे मेयर होते. त्यांनी आपल्या निर्भय धोरणाने बारा वर्षांच्या काळात न्यूयॉर्कचा कायापालट केला. जुगाराची हकालपट्टी करण्याचे आपले अभिवचन पुरे केले. ही गौरवशाली परंपरा पुढे चालविणारा मेयर न्यूयॉर्कला त्यानंतर लाभला नाही. सध्याचे मेयर रॉबर्ट एफ् वॅगनर आतापर्यंत तीनवेळा लागोपाठ निवडून आले आहेत. (निवडणूक दर चार वर्षांनी होते) त्यांच्या कारभाराबद्दल नागरिकांत असंतोष आहे; असे असूनहि ते पुन: निवडून येतात, याचे एक कारण म्हणजे रिपब्लिकन पक्षाजवळ प्रभावी उमेदवार नव्हता. येत्या नोव्हेंबरात निवडणूक आहे.

## ● नेहरूभक्त केशव

पंडित नेहरूंचा पहिला स्मृतिदिन २७ मेस आला, तेव्हा अमरेळीचा एक कामगार केशवला स्वस्थ बसवेना. पंडितजींना आवडतात त्या गोष्टींसाठी आपल्याजवळचे असेल ते सारे द्यावयाचे, असे त्याने ठरविले होते. शहरातील अनेक वर्षांच्या

मजुरीचे कमाईतून त्याने २६० रु. व थोडासा गहू आणि गूळ साठविला होता. अमरेळीजवळच केरियाचाड हे त्याचे खेडे आहे. ही जमविलेली सारी पुंजी खर्चून त्या दिवशी गावच्या मुलांना त्याने जेवण घातले.

केशवला पंडितजींना भेटण्याची फार इच्छा होती. काँग्रेसचे माजी अध्यक्ष ढेवर यांच्या मदतीने ती इच्छा पुरी झाली. केशव दिल्लीला गेला व त्याने नेहरूंची भेट घेतली. देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी फार परिश्रम घेऊन काम करणारांची




" पायलटला विमान कसे चालवावे हे सांगायला लागलीस !
तो काही तुझा नवरा नव्हता, वाटेल ते ऐकून घ्यायला. "

देशाला आज गरज आहे, असे पंतप्रधानांनी त्याला सांगितले. हा संदेश नेहमी डोळ्यांपुढे ठेवून केशव सतत कामात गढलेला असतो आणि आपल्या श्रमाची कमाई तो नेहरूंना आवडणाऱ्या गोष्टींवर खर्च करतो.

## ● बंद घड्याळे, बंद कारभार

दिल्लीच्या नव्या सचिवालयातील जवळजवळ दोनशे घड्याळे गेल्या महिनाभर बंद आहेत. या घड्याळांची देखभाल करण्यासाठी [ घड्याळांना किल्ली देणे, नादुरुस्त घड्याळे दुरुस्त करणे ] अर्थखात्याने एक कॉन्ट्रॅक्टर नेमला होता. एक महिन्यापूर्वी तो काम सोडून निघून गेला. घड्याळांना हात लावण्याची दुसऱ्या कोणाला परवानगी नाही. आता दुसरा कॉन्ट्रॅक्टर नेमला जाऊन त्याने किल्ली देईपर्यंत ही घड्याळे बंदच राहणार. ही बंद घड्याळे म्हणजे आमच्या सरकारी कारभाराच्या कार्यक्षमतेचीच निदर्शक आहेत. किल्ली देणारा नाही, म्हणून घड्याळे बंद. तसेच सरकारी कारभाराचे आहे. या कारभाराला किल्ली देणारा, गती देणारा कार्यक्षम अधिकारी नसेल, तर त्याची चक्रे बंद पडतात आणि फायलींचे ढिगावर ढीग साचतात.

● ● ●


**राजा शिवछत्रपती**

**ब. मो. पुरंदरे**

[ पूर्वार्ध : उत्तरार्ध ]

**मूल्य छत्तीस रुपये**

आपल्या ग्रंथविक्रेत्याकडे संपूर्ण
ग्रंथाची आजच मागणी करा

**किंवा लिहा**

**राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २**


| | |
|---|---|
| लालमहाल | प्रतापगड |
| पन्हाळगड | राजगड |
| पुरंदर | आग्रा |
| लेखक<br>ब. मो. पुरंदरे<br>रा ज हं स | मूल्य<br>प्रत्येकी रुपये दोन<br>प्र का श न, पु णे. |

MANOOS (Fortnightly) : 15 June 1965 : 30 Paise : Regd. No. B 9304

प्रगतिपथावरील पुढचे पाऊल...

स्वस्तिक

चप्पल्स



स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लिमिटेड, खडकी, पुणें 3.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९